नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २४० * ※ अमरावती ※ रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## खाण दुर्घटनेतील ५ मृतदेह सापडले

■ **वृत्तसंस्था, भुवनेश्वर, दि. २२ : :**
आसाममधील बेकायदेशीर खाण दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या आणखी ५ कामगारांचे मृतदेह सापडले आहेत. बचाव पथकाला शोध मोहीम पूर्ण करण्यासाठी ४४ दिवस लागले.

पोलिसांनी सांगितले की मृतदेह खूपच कुजले होते. कामगारांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचणी केली जाईल. यापूर्वी ८ जानेवारी रोजी एक मृतदेह आणि ११ जानेवारी रोजी तीन मृतदेह सापडले होते. प्रत्यक्षात, दिमा हासाओ जिल्ह्यातील उमरांगसो कोळसा खाणीत पाणी भरल्याने ९ कामगार अडकले होते. गेल्या अनेक दिवसांपासून या मजुरांना शोधण्याचे प्रयत्न सरकारकडून सुरू होते.

## प्रधानमंत्री मोदींच्या प्रधान सचिवपदी
# शक्तिकांत दास यांची नियुक्ती

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :**
रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांची पंतप्रधान मोदींचे प्रधान सचिव-२ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कॅबिनेट नियुक्ती समितीने शनिवारी ही नियुक्ती केली. समितीचे सचिव मनीष सक्सेना यांनी नियुक्तीबद्दल माहिती दिली.



शक्तीकांत दास १० डिसेंबर रोजी आरबीआय गव्हर्नर पदावरून निवृत्त झाले. २२ फेब्रुवारी रोजी त्यांची पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून नियुक्ती झाली. सध्या, पीके मिश्रा पंतप्रधान मोदींचे प्रधान सचिव म्हणून पहिल्या क्रमांकाचे पद भूषवत आहेत. शक्तिकांत दास दुसऱ्या क्रमांकावर असतील. दास हे १९८० च्या बॅचचे तामिळनाडू कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत. तर मिश्रा हे गुजरात केडरचे निवृत्त अधिकारी आहेत.

रिझर्व्ह बँकेचे २५ वे गव्हर्नर म्हणून काम करण्याव्यतिरिक्त, दास यांनी भारताचे जी २० शेर्पा आणि १५ व्या वित्त आयोगाचे सदस्य म्हणूनही काम केले आहे. त्यांनी त्यांच्या ४२ वर्षांच्या कारकिर्दीत वित्त, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात काम केले आहे.

शक्तीकांत दास यांची २०२३ आणि २०२४ मध्ये सलग दोनदा जगातील सर्वोच्च केंद्रीय बँकर म्हणून निवड झाली. शक्तिकांत दास यांना सेंट्रल बँक रिपोर्ट कार्ड २०२३ आणि २०२४ मध्ये अ+ ग्रेड मिळाली. हा पुरस्कार अमेरिकेतील वॉशिंग्टन डी.सी. येथे देण्यात आला.

## भारत विरूद्ध पाक
# महामुकाबला!




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
चॅम्पियन्स ट्रॉफीमधील भारत विरूद्ध पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज सामना आज रविवार २३ फेब्रुवारीला दुबईमध्ये होणार आहे. भारतीय संघाने बांगलादेशविरुद्ध ६ विकेट्सने विजय मिळवत विजयासह मोहिमेची सुरूवात केली.

आता टीम इंडियाचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. या मैदानावर टीम इंडियाचा रेकॉर्ड उत्कृष्ट आहे आणि या मैदानावर बांगलादेश, पाकिस्तान, हाँगकाँग आणि अफगाणिस्तानविरुद्ध सामने खेळले आहेत. भारतीय संघाने दुबईच्या मैदानावर आतापर्यंत एकूण ७ एकदिवसीय सामने खेळले आहेत, त्यापैकी ६ जिंकले आहेत आणि एक सामना बरोबरीत राहिला आहे. या मैदानावर टीम इंडियाला एकदिवसीय क्रिकेटमध्ये पराभवाचा सामना करावा लागला नाही. या सामन्याची जगभरातील क्रिकेटप्रेमींना उत्सुकता लागून राहिली आहे.

## साक्षरतेच्या जोडीला शहाणपण हवेच
### संमेलनाध्यक्षा तारा भवाळकर यांचे परखड मत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :**
९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉक्टर तारा भवाळकर यांनी आज संमेलनाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर लोकसाहित्य व मराठी भाषेच्या मुद्यावर आपले रोखठोक भाषण केले. यावेळी त्यांनी विविध उदाहरणे देऊन भाषा किती महत्त्वाची असते हे अधोरेखित केले. साक्षरतेच्या जोडीला शहाणपण नसेल तर साक्षरतेचा काहीही उपयोग नाही, असे त्या म्हणाल्या.



भवाळकर म्हणाल्या, साहित्य संमेलन सुरू झाले त्यावेळी ते काही ठराविक वर्गातील लोकांचे होते. मी वर्ग हा शब्द अर्थशास्त्रीय परिभाषेतील वापरला आहे. महात्मा फुले यांनी त्या संमेलनाला घालमोड्या दादांचे संमेलन अशी उपमा दिली होती. घालमोडे दादा हा पुन्हा बोलीभाषेतला शब्द आहे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हा होता की, हे तथाकथित उच्चवर्णीयांचे संमेलन असून त्यात आमच्यासारख्या श्रमकऱ्यांना त्यात स्थान आहे की नाही याची शंका यावी. त्यामुळे महात्मा फुले यांनी संमेलनावर टीका केली होती. आज व्याप्ती विस्तारते आहे.

इंग्रजोत्तर काळात एक असा समज झाला आहे की, सुशिक्षित कुणाला म्हणायचे? तर ज्याला लिहिता वाचता येते तो सुशिक्षित. बायका व श्रमकरी वर्गातील लोक इंग्रजोत्तर काळात ज्यावेळी सार्वजनिक शाळा, महाविद्यालये निर्माण झाली तेव्हापासून शिकायला लागली. श्रमकरी वर्ग, स्त्रिया शिकू लागल्या. तोपर्यंत सर्वजण अडाणी आहेत असा एक समज होता. आजही कुणी शाळेत जात नसेल तर विशेषतः बायका औपचारिक शिक्षण घेतलेल्या नसतील तर त्यांचा उल्लेख अडाणी असा केला जातो.

**अडाणी संत स्त्रियांनी मला पुस्तकांहून जास्त शिकवले**

संमेलनाध्यक्षा म्हणाल्या, लोकसंस्कृतीमधील ओव्या ज्यावेळी मी सांगते किंवा आमचे सहकारी जेव्हा म्हणतात की, त्या अडाणी असूनही त्यांनी एवढे चांगले लिहिले. त्यावेळेस मला त्यांनी अडाणी म्हणणाऱ्यांच्या अडाणीपणाचा फार राग येतो. कारण, केवळ लिहिता वाचता येणे म्हणजे शहाणपण असे नाही. साक्षरतेच्या जोडीला शहाणपण नसेल, तर त्या साक्षरतेचा उरपयोग नाही. पुस्तकांपेक्षा अशा अडाणी संत महिलांनीच मला अधिक शिकवल्याचा उल्लेख त्यांनी केला . यावेळी संमेलनाध्यक्षा तारा भवाळकर यांनी यावेळी बहिणाबाई चौधरी यांच्या काही ग्रामिण कवितांचे दाखले देत स्वतःला उच्चभ्रू समजणाऱ्यांवर ताशेरे ओढले.

## सहकारी चळवळीतून प्रत्येकाला
# क्षमतेनुसार काम शक्य : शहा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २२ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासमोर दोन संकल्प ठेवले आहेत. यामध्ये 2017 पर्यंत या देशाला पूर्ण विकसित राष्ट्र बनवायचे आहे. तसेच 2027 पर्यंत या देशातील अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलरची करायची आहे. हे दोन्ही संकल्प सहकारी क्षेत्राचा विकास केला नाही तर अपूर्ण राहतील, असे मत केंद्रीय गृह तसेच सहकारिता मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केले आहे. पुण्यातील जनता सहकारी बँक लिमिटेडच्या हीरक महोत्सवाचा समारोप त्यांच्या उपस्थित झाला. या वेळी ते बोलत होते.



अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह सहकारी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. अमित शहा दोन दिवसांच्या पुणे जिल्हा दौऱ्यावर असून या दरम्यान त्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली.

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेनुसार काम देणे आणि त्याला देशाच्या विकासासोबत जोडणे हे केवळ सहकारी चळवळीतून शक्य असल्याचे अमित शहा म्हणाले.

## तारकर्ली समुद्रात तिघे बुडाले

■ **वृत्तसंस्था, तारकर्ली (सिंधुदुर्ग), दि. २१ :**
शनिवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास तारकर्ली समुद्रात पोहण्यासाठी गेलेल्या पाच युवकांपैकी तीनजण पाण्यात बुडाल्याची दुर्दैवी घटना घडली. या तिघांना तातडीने बाहेर काढून ग्रामीण रुग्णालय, मालवण येथे दाखल करण्यात आले. मात्र, त्यातील दोन युवकांचा मृत्यू झाल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली. तर एकाची प्रकृती अत्यंत गंभीर आहे.

ग्रामीण रुग्णालय, मालवण येथून मिळालेल्या माहितीनुसार, मृत युवकांमध्ये शुभम सुशील सोनवणे (वय २२ वर्षे, राहणार हडपसर, पुणे), रोहित बाळासाहेब कोळी (वय २१ वर्षे, राहणार हडपसर, पुणे) यांचा समावेश असून, ओंकार रामचंद्र भोसले (वय २३ वर्षे, पुणे) यांची प्रकृती गंभीर आहे. त्याला डॉ. अविनाश झाटये यांच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.



## विमानतळासमोरील पंचतारांकित हॉटेलला आग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
मुंबई विमानतळाच्या अगदी समोर असलेल्या पंचतारांकित हॉटेलला आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे सात ते आठ बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत.

ही आग नेमकी कशामुळे लागली? याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. तसेच या आगीत कोणी अडकले आहे का? याचा देखील तपास केला जात आहे. मात्र आग मोठी असून हवेमध्ये धुराचे मोठे लोट दिसून येत आहे.

## दिग्दर्शक असल्याने अभिनेता म्हणून मर्यादा.... सचिन

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २२ :**
सध्यातरी आता मी पडद्यावर येणार नाही. कारण सध्या माझ्याकडे तसं काही काम नाहीये. मला कोणी अभिनेता म्हणून घेतही नाहीअसे वक्तव्य मी गमतीने केले होते असे मराठी चित्रपटातील आघाडीचा अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता सचिन पिळगांवकर याने आज येथे पत्रकारांशी बोलतांना सांगितले.




स्थळ या मराठी चित्रपटाच्या प्रमोशनसाठी सचिन चंद्रपुरात आला असता पत्रकारांशी संवाद साधतांना अनेक विषयांवर व्यक्त झाला. माझ्याकडे काम नाही हे मी गमतीने बोललो होतो, मात्र दिग्दर्शक असल्यामुळे एक अभिनेता म्हणून मला चित्रपटात कुणी घेत नाही ही वस्तुस्थिती आहे असेही सचिन म्हणाला.

मी कलावंत आहे, अभिनेता, दिग्दर्शक आहे, तेव्हा मी माझे चित्रपट करणार ही वस्तुस्थिती असली तरी अभिनेता म्हणून इतरांनीही संधी द्यायला हवी, मात्र मी त्यांच्या चित्रपटात काम करणार नाही अशा समजातून ते चित्रपटात घेतच नाही, हे सर्व स्वयंम् घोषित आहे, मी अभिनय सोडलेला नाही, सोडणारही नाही, असेही सचिन म्हणाला.

## पुलाचे काम करणाऱ्या मजुरांवर
# झोपेतच काळाचा घाला
## ५ जणांचा दबून मृत्यू



■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २२ :**
दिवसभर पुलाचे काम करून पत्र्याच्या शेडमध्ये रात्री झोप घेणाऱ्या मजुरावर पहाटे काळाने घाला घातला. रात्री अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या टिप्पर चालकाने मजूर झोपलेल्या पत्र्याच्या समोर वाळू रिकामी केल्याने वाळू खाली दबून पाच मजुरांचा मृत्यू झाला.

जाफराबाद तालुक्यातील पासोडी चांडोळ रोडवर पुलाचे काम चालू होते या कामासाठी सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव येथील मजूर येथे गुत्तेदाराकडे पूल उभारणीचे काम करत होते. पत्र्याचे शेड करून सर्व मजूर पुलाजवळच राहत होते.

दरम्यान रात्री सर्व मजूर जेवण करून झोपले होते. एकूण सात जण या पत्र्याच्या शेडमध्ये झोपलेले होते. या पुलाच्या कामासाठी रात्री वाळू घेऊन एक टिप्पर आला. अवैधरित्या वाळूची वाहतूक करत असल्याने घाई गडबडीत अंधारामध्ये त्यांनी पत्र्याच्या शेडवरच वाळू उतरवली यात वाळूखाली दबून ५ जणांचा मृत्यू झाला. गणेश काशिनाथ धनवई (४० रा.गोळेगाव) भूषण गणेश धनवई, (१६) सुनील समाधान सपकाळ (२०)यांच्यासह अन्य दोघांचा मृत्यू झाला. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## इंदिरा गांधींच्या मारेकऱ्याच्या पुतण्याला न्यूझीलंडमध्ये शिक्षा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :**
भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे मारेकरी सतवंत सिंग यांचे पुतणे भारतवंशीय बलतेज सिंग (३२) यांना न्यूझीलंडमध्ये २२ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला ७०० किलो मेथाम्फेटामाइन (ड्रग) बाळगल्याबद्दल दोषी ठरवले आहे. शुक्रवारी ऑकलंड उच्च न्यायालयाने बलतेज सिंगला शिक्षा सुनावली.



बलतेज सिंगला मार्च २०२३ मध्ये न्यूझीलंड पोलिसांनी अटक केली होती. ऑकलंड पोलिसांनी मनुकाऊ येथील एका लहान गोदामावर छापा टाकला, जिथे बिअरच्या कॅनमध्ये मेथाम्फेटामाइनचा मोठा साठा लपवण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास २१ वर्षीय एडेन सगाला नावाच्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर सुरू झाला. त्याने कथितरीत्या ड्रग्ज असलेली बिअरच घेतली होती.

पोलिस तपासात असे दिसून आले की हिम्मतजीत जिमी सिंग काहलोन नावाच्या व्यक्तीने ही बिअर सागाला दिली होती. नंतर जिमी सिंगला खुनाच्या रकमेपेक्षा सदोष मनुष्यवधाचा दोषी ठरवण्यात आले. सुनावणीदरम्यान जिमी सिंग यांनी सांगितले की, त्यांना एका विश्वासू व्यावसायिक मित्राने फसवले आणि ते स्वतः या कटाचा बळी ठरले. गुप्तचर सूत्रांचा दावा आहे की हा 'विश्वासू व्यापारी' बलतेज सिंग या ड्रग्ज तस्करी नेटवर्कचा मास्टरमाइंड होता.

न्यूझीलंड पोलिसांनी अधिकृतपणे बलतेज सिंगच्या नावाची पुष्टी केलेली नसली तरी, गुप्तचर संस्थांनी २२ वर्षांची शिक्षा झालेल्या व्यक्तीचे नाव बलतेज सिंग असल्याची पुष्टी केली आहे. न्यूझीलंडच्या माध्यमांनी मृत सागालाला बिअरचा कॅन देणाऱ्या हिम्मतजीत काहलोनचे नावही नमूद केले आहे.

परंतु न्यूझीलंडच्या माध्यमांनी स्पष्ट केले आहे की ड्रग्ज तस्करी नेटवर्कचा सूत्रधार असलेल्या त्याच्या साथीदाराला २२ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.



# त्या पिडीतेच्या मोबाईलमध्ये आढळले तीन आक्षेपार्ह व्हिडीओ

**जिल्हा बालसंरक्षण अधिकाऱ्यांच्या पथकाकडून त्या मठात चौकशी**

### पोलिसांनी मोबाइल केला जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.22 )**– शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका मठात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर मठप्रमुखासह तिघांनी अत्याचार केला. यामध्ये ती गर्भवती झाल्याचे धक्कादायक प्रकरण तीन दिवसांपूर्वी उघड झाले. दरम्यान याच प्रकरणात काही आक्षेपार्ह व्हिडिओ व फोटो पोलिसांना पीडितेच्या मोबाइलमध्ये आढळले. त्यामुळे पोलिसांनी तो मोबाइल जप्त केला आहे. तसेच या प्रकरणात चौकशीसाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी व त्यांचे पथक शुक्रवारी (दि. दे. 21) मठात पोहोचले होते. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी व पथकाने मठात जाऊन पाहणी केली. मुलीवर ज्या ठिकाणी अत्याचार झालेत, ती जागा तळघरात आहे. या मठात पथक गेले त्यावेळी 3 व्यक्ती व एक पुरुष मठात होते. तसेच पीडितेची आई होती. हे सर्व जण 14 फेब्रुवारीपासूनच मठात आल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी मठात असलेले सर्व महिला व पुरुष मागील दोन दिवसांत त्या ठिकाणाहून निघून गेले आहेत. मात्र मठात कोण येतो, कोण राहतो, किती दिवस राहतो, याबाबत कोणत्याही नोंदी नाहीत किंवा तसे रजिस्टर त्या ठिकाणी नाही. याचवेळी पथकाने गावातील सरपंच, सचिव व काही नागरिकांची भेट घेतली. तसेच ग्राम बालसंरक्षण समितीसोबत बैठक घेतली. गावात ग्राम बालसंरक्षण समितीची स्थापना झाली आहे, या समितीला दरमहा बैठक होणे आवश्यक आहे. मात्र समितीने अलीकडे बैठक घेतल्याचे निदर्शनास आले नसल्याचे बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. कारण गावात बैठक झाली असती तर त्यांच्याकडे गावामध्ये 18 वर्षांपेक्षा कमी वयाचे मुले व मुली किती आहेत, याबाबत माहिती राहिली असती. मात्र पुढील काळात नियमित बैठका घेऊन गावात सर्वेक्षण करून अल्पवयीन मुले, मुलींची माहिती घेण्याबाबत सूचना दिल्या असल्याचे बाल संरक्षण अधिकारी अजय डबले यांनी सांगितले आहे.

### अनेक मठांची नोंदणीच नाही

दरम्यान, अल्पवयीन मुलीवर केलेल्या अत्याचाराच्या घटनेने खळबळ उडाली आहे. घटनास्थळ असलेल्या मठासह अनेक मठांची धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी नाही; नोंदीच्या सूचना–मुलीवर ज्या मठात अत्याचार झाले, त्या मठाची धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीच नसल्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. पुढील काळात मठात येणाऱ्या, जाणाऱ्यांच्या नोंदी ठेवण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत.

“आक्षेपार्ह व्हिडिओची फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणी होणार या प्रकरणात आम्ही पीडितेचा मोबाइल जप्त केला आहे. त्या मोबाइलमध्ये काही आक्षेपार्ह व्हिडिओ व फोटो मिळाले आहेत. त्या व्हिडिओ व फोटोंची फॉरेन्सिक लॅब मध्ये तपासणी केली जाणार आहे.

**सचिन लुले, ठाणेदार, शिरखेड.**

# महापालिकेच्या निवृत्त अभियंत्याच्या घरी 10 लाखांची चोरी

- बडनेरा शहरातील अशोक नगरमधील घटना
- श्वान पथक व फिंगर प्रिंट एक्सपर्ट घटनास्थळी



**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा, ( दि.22 )**– येथील निवृत्त उपअभियंता भास्कर तिरपुडे (60) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा 10 लाख रुपयांचा माल चोरून नेला. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर बडनेरा पोलिसांनी श्वान पथक आणि फिंगर प्रिंट तज्ज्ञांच्या पथकालाही घटनास्थळी पाचारण केले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बडनेरा शहरातील नवीन वस्ती झाडीफैल जवळील अशोक नगरात महापालिकेचे सेवानिवृत्त उपअभियंता भास्कर किसनराव तिरपुडे यांचे घर आहे. नुकतेच त्यांनी नवीन घर बांधले आहे. याच कारणावरून त्यांनी गेल्या चार दिवसांपासून अशोक नगरातील घराला कुलूप लावून नवीन घरात राहायला गेले होते.

याचा फायदा घेत शुक्रवारी रात्री एका चतुर चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर चोराने कपाटातून रोख 5 लाख 50 हजार रुपये व 8 तोळे सोन्याचे दागिने असा एकूण 10 लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. शनिवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. घराचे कुलूप तुटलेले पाहून कोणीतरी भास्कर तिरपुडे यांना ही माहिती दिली. त्यांनी तातडीने घरी पोहोचून पाहणी केली असता, घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले आणि कपाटातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम गायब होती. याबाबत बडनेरा पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस ठाण्याचे अधिकारी सुनील चव्हाण आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. सहाय्यक पोलिस आयुक्त कैलास पुंडकर आणि गुन्हे शाखेच्या पथकानेही घटनास्थळाची पाहणी केली. बडनेरा पोलिसांनी फिंगर प्रिंट एक्सपर्ट आणि डॉग हॅण्डलर यांनाही घटनास्थळी पाचारण केले.

### सीसीटीव्हींची तपासणी

जवळपासच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेजही स्कॅन करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत आरोपीची ओळख पटलेली नाही. या घटनेने कॅम्पसमध्ये खळबळ उडाली आहे. याप्रकरणी बडनेरा पोलीस अधिक तपास करत आहेत.

### जखमी अवस्थेत आढळले जंगली डुक्कर

**अमरावती** – मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गुगामल वन्यजीव अभयारण्याच्या बोरीखेडा मार्गावर जखमी व बेशुद्ध अवस्थेत एक जंगली डुक्कर आढळून आले. शुक्रवारी (दि.21) स्थानिक नागरिकांनी याची माहिती वनविभागाला दिली. ढाकणा वनक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या बोरी खेडा वनखंड क्रमांक 743 धारणी–अकोट मार्गावर हे जंगली डुक्कर बेशुद्ध अवस्थेत पडलेले होते. वनरक्षक ए.पी. डाखोरे यांनी याची माहिती वरिष्ठांना दिली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी जखमी अवस्थेत असलेल्या या जंगली डुक्करावर उशिरापर्यंत उपचार केले नसल्याची माहिती आहे.

# कार ची दुचाकीला धडक, युवकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 )**– अमरावती–चांदुर रेल्वे मार्गावर पोहराजवळ भरधाव कार ने दुचाकीला धडक दिली. या अपघातात केतन त्र्यंबक मांढरे (रा. डोरलीपुरा,यवतमाळ) हा गंभीर जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार दरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी कार चालकावर (दि.21) गुन्हा दाखल करण्यात आले.

माहितीनुसार, केतन मांढरे हा दुचाकी क्रमांक एम एच बीटी 4163 ने सावंगा येथे जात होता. दरम्यान अमरावती मार्गे चांदुर रेल्वे कडे जाणाऱ्या कार क्रमांक एम एच 18 डब्ल्यू 33 87 ने त्याच्या दुचाकीला पोहरा वॉटर पार्क जवळ धडक दिली. त्यामुळे या अपघातात केतनच्या डोक्यावर गंभीर इजा झाली होती. जखमी अवस्थेत त्याला जिल्हा सामान्य रुग्णाला दाखल करण्यात आले होते. येथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. केतन चे वडील त्र्यंबक दादाजी मांढरे (वय 57) यांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी कारचालक स्वानंद ज्ञानेश्वर मांगे (वय 39) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# मालमत्ता जप्ती अन् मालमत्ता करासाठी मनपा मोहीम

**सुट्टीच्या दिवशीही 67.21 लाखाची वसुली**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 )** – महानगर पालिकेच्यावतीने शनिवारी (ता. 22) पाचही झोन अंतर्गत थकीत मालमत्ता धारकांच्या मालमत्तेवर जप्ती संदर्भात कार्यवाही करण्यात आली. तसेच शहरात अन्य ठिकाणी मालमत्ता कर वसुल करण्यात आली. यावेळी एकूण 67.21 लाख मालमत्ता कर वसुल करण्यात आला.

या माहीमेत झोन क्र.1 रामपुरी कॅम्प मधील मालमत्ता कर वसुल रु. 6.95 लाख, झोन क्र.2 राजापेठ मधील मालमत्ता कर वसुल रु. 22.92 लाख, पुर्व झोन क्र.3 दस्तुरनगर मधील मालमत्ता कर वसुल रु. 19.67 लाख, दक्षिण झोन क्र.4 बडनेरा मधील मालमत्ता कर वसुल रु. 7.91 लाख, पश्चिम झोन क्र.5 भाजीबाजार मधील मालमत्ता कर वसुल रु.9.96 लाख असे एकुण 67.21 लाख मालमत्ता कर वसुल करण्यात आला. ही वसुली सुट्टीच्या दिवशी करण्यात आली असून, थकीत कर वसुली मालमत्ता धारकांकडून करण्यात आली.

### अशी झाली झोन निहाय वसूली

| | |
|---|---|
| उत्तर झोन क्र. 1 (रामपुरी कॅम्प) | : रु. 6.95 लाख |
| मध्य झोन क्र. 2 (राजापेठ) | : रु. 22.92 लाख |
| पूर्व झोन क्र. 3 (दस्तुरनगर) | : रु. 19.67 लाख |
| दक्षिण झोन क्र. 4 (बडनेरा) | : रु. 7.91 लाख |
| पश्चिम झोन क्र. 5 (भाजीबाजार) | : रु. 9.76 लाख |
| एकुण वसुली | : रु. 67.21 लाख |

# गुण कमी मिळाल्याने विद्यार्थिनीने घेतली कॉलेजच्या इमारतीवरून उडी

**आधी कापली नस, नंतर घेतली उडी | आत्महत्येचा प्रयत्नामुळे उपचार सुरु, प्रकृती स्थिर**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 )** – कमी गुण मिळाल्याने एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीने हाताची नस कापून थेट इमारतीवरून उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेमुळे महाविद्यालयीन वर्तुळात खळबळ उडाली आहे. ही घटना 21 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली असून, मुलीवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अमरावती शहरातील फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील एका नामांकित महाविद्यालयात बीएचएमएसच्या द्वितीय वर्षाला शिकणार्या एका विद्यार्थिनीने 21 फेब्रुवारी रोजी 11 वाजताच्या सुमारास इमारतीच्या तिसर्या मजल्यावरून उडी घेतल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. या घटनेनंतर विद्यार्थिनीला रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले. या घटनेच्या माहितीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी महाविद्यालय व रुग्णालयात जाऊन चौकशी केली.

### विद्यार्थीनीजवळ आढळली एक सुसाइड नोट

विद्यार्थिनीने आत्महत्येच्या प्रयत्नापूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्या चिठ्ठीत परीक्षेत गुण कमी मिळाल्याचे कारण सांगितले आहे. परंतू पोलिसांनी मुलीचे बयाण नोंदविले असता, पाय घसरून पडल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसही संभ्रमात पडले आहे.

# गुरुदेवनगरातील माऊली अपार्टमेंटमध्ये चोरी



अमरावती = गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गुरुदेव नगर स्थित माऊली अपार्टमेंटमध्ये चोरी झाल्याची घटना 21 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. घटनेची तक्रार महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. महिला ही पिडिएमसीत नोकरी करीत असून, त्या कामावर गेल्या होत्या. तर त्यांची मुलगी ही शिकवणी वर्गासाठी गेली होती. दरम्यान चोराने घरातून 89 हजार 100 रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

# दुरंतो एक्स्प्रेसमध्ये महिलेची पर्स लंपास

### हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार दिल्यानंतर आरोपी गजाआड




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 )** – दुरंतो एक्स्प्रेसमधून एक महिला आपल्या तीन वर्षाच्या मुलीसोबत प्रवास करीत होती. दरम्यान चोरट्यांनी महिला झोपेत असताना पर्स चोरून नेली. महिलेने हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार दिल्यानंतर तत्काळ आरपीएफ कर्मचाऱ्यांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले.

मुशरफ शहा मकबुल शहा (24), शेख नावेद शेख जावेद (18) रा. चिखली, यश सुखदेव बनसोड(21) रा.बुलढाणा अशी पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. फिर्यादी महिला मुंबई ते नागपूर आपल्या तीन वर्षाच्या मुलीसह दुरंतो एक्स्प्रेसने प्रवास करीत होती. झोपेत असताना आरोपींनी तिच्या उशाशी असलेली पर्स चोरून नेली. पर्समधील 4800 रुपये घेऊन पसार झाले. पहाटे अकोला स्टेशन सुटल्यानंतर महिलेला जाग आली. उशाशी असलेली पर्स गायब असल्याचे दिसल्यानंतर महिलेने शोधाशोध केली असता एका प्रवाशाने ती पर्स शौचालयात असल्याचे सांगितले. त्यानंतर या महिलेने रेल्वेच्या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती दिली. त्याच दरम्यान गाडीतील आरपीएफ कर्मचाऱ्यांनी बडनेरा स्टेशन येथे तीनही संशयितांना बडनेरा रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले होते. पोलिस हिसका दाखवल्यानंतर या तिघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. नागपूर येथे पोहोचल्यानंतर फिर्यादी महिला बडनेरा रेल्वे पोलिस ठाण्यात आली. तिच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेच्या पर्समधील चोरीस गेलेले पैसे पोलिसांनी जप्त केले आहे.

# अंजनगाव सुर्जीच्या सहकार क्षेत्रात भुकंप

**कृउबा समिती सभापती जयंत साबळे यांच्या नेतृत्वात अख्खा गटच भाजपमध्ये**

### काँग्रेसप्रणित सहकार पॅनलला जबर धक्का



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.22 )**– तालुक्यातील सहकार क्षेत्रात काँग्रेस प्रणित असलेल्या सहकार पॅनलला जबर धक्का बसला आहे. कृषी उत्पन्न समितीचे सभापती जयंत साबळे यांच्यासह तब्बल दोन डझन सदस्यांनी शुक्रवारी(दि.21) भाजपमध्ये प्रवेश केला. हा फेरबदल तालुक्यातील सहकार क्षेत्रातील मोठा भुकंप मानल्या जात आहे.

तालुक्यातील सहकार क्षेत्राचे सुत्र निर्निवादपणे अनंत साबळे यांच्या हाती राहीले आहे. गेल्या दोन वर्षापासून तालुक्यातील बाजार समिती, खरेदी विक्री आणि सहकारी संस्थावर सहकार पॅनलच्या हाती एकछत्री अंमल होता.

विरोधकांनी सहकार पॅनलच्या विरोधात केलेल्या तक्रारीमूळे अनंत साबळे यांचे बंधू ॲड.जयंत साबळे यांना कृउबा समितीच्या सभापतीपदावरुन पायउतार व्हावे लागले होते. सहकार पॅनलमध्ये कुरघोडीचे राजकारण सुरु असतानाच तालुक्यातील सोसायट्या, खरेदी विक्री संघ, जिनींग प्रेसीग, कृषी उत्पन्न बाजारसमितीवर पकड असलेले कृउबा समितीचे सभापती ॲड.जयंत साबळे यांनी भाजपा पक्षाचे नेतृत्व मान्य करीत भाजपा मध्ये प्रवेश केल्याने तालुक्यातील सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

### पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत प्रवेश

शुक्रवारी (दि.22) पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार डॉ.संजय कुटे, आ.प्रविण पोटे, आ.रवि राणा, आ.प्रताप अडसड, आ.प्रविण तायडे यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश करण्यात आला. तीनही महत्वाचे संस्था कृषी उत्पन्न बाजारसमीती, खरेदी विक्री संघ, जिनींग प्रेसीग यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व बहुसंख्य संचालकांनी पक्ष प्रवेश केला.

### यांनी घेतला प्रवेश

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड.जयंत साबळे यांच्या नेतृत्वात संचालक शंकरराव चोरे, विजयराव कळमकर, अनंत रोकडे, विशाल पंडीत, सागर घोगरे, संजय काळमेघ, चंद्रशेखर शेळके, शे.जमील शे.रहमान, संचालीका पूनम पोटे, शारदा ढोक तर जिनींग प्रेसींग चे अध्यक्ष सुबोध काळमेघ, गुरुदास वानखडे, माजी अध्यक्ष अशोक चरपे, गणेश सावरकर, प्रशांत भगत तर खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजानन धोटे, सुनिल राऊत, रवि पोटे, माजी संचालक अमोल पोटे, संजय ढोक इत्यादीं मंडळीनी भाजपाचा झेंडा खांद्यावर घेतला.

### राजकारणात गॉडफादर आवश्यक

सहकारातून शेतकऱ्यांना समृद्धी कडे जाण्यासाठी राजकारणात गॉडफादर असणे आवश्यक आहे. अंजनगाव तालुक्यातील सहकारी संस्था व कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत शेतकऱ्यांच्या सुख सुविधेसाठी नियोजित विकास कामे पूर्ण करण्याची आमचे सर्वांची उद्दिष्ट आहेत. याच सर्व पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे ध्येय विकासाला साथ देण्याचे असल्यामुळे भाजपा पक्षाची कास धरली आहे. पुढील काळात भारतीय जनता पार्टी पक्ष तसेच तालुक्यातील सहकारी संस्था व बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विकासाचा अजेंडा राबवण्यासाठी आम्ही सर्व तत्पर राहू.

**ॲड. जयंत साबळे, सभापती कृ.ऊ.बा.स.अंजनगांव सुर्जी**

# सुपर स्पेशालिटीत कॅन्सरची जटिल शस्त्रक्रिया

### महिलेच्या पोटातून काढला 24.4 किलोचा गोळा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 )** – शासकीय विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे एका 35 वर्षीय महिलेवर पोटातील कॅन्सरची जटिल शस्त्रक्रिया (दि.22) करण्यात आली. चार तास चाललेल्या या शस्त्रक्रियेत 24.4 किलो वजनाचा गोळा काढून त्या महिलेला जीवनदान दिले. सुपर स्पेशालिटी येथील डॉक्टर्स व त्यांच्या चमूनी शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली.

धारणी तालुक्यातील खटणार येथील 35 वर्षीय महिला तीन मुलांची आई आहे. मागील आठ ते नऊ महिन्यांपासून तिच्या पोटाचा आकार वाढत होता. यावेळी अधून मधून पोटात दुखायचे म्हणून महिलेने जवळच्या रुग्णालयात जाऊन तपासणी केली. तपासणी अंती या महिलेच्या पोटात पाणी आहे. असे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर उपचार घेऊन किमान तीन ते चार वेळा पोटातील पाणी काढण्याचे अयशस्वी प्रयत्न देखील झाले. मात्र काही केल्या पोटाचा आकार कमी होत नव्हता. तसेच त्यांना त्रास वाढून श्वास घेणेही कठीण झाल्याने खाणे पिणेही बंद झाले होते. याशिवाय वजन वाढणे आणि कमजोरीही वाढली होती. शरीरातील रक्त कमी झाले होते. त्यामुळे स्थानिक डॉक्टरांनी अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात या महिलेला पाठविले. यावेळी महिलेची तपासणी केली असता पोटात पाणी नसून मोठी गाठ असल्याचे निदर्शनास आले. ही गाठ पोटात सर्वत्र परसरली होती. त्यामुळे शरिरातील आतड्या, फुफुस पोट, किडनी, इतर अवयव दबल्या गेले. सुपर स्पेशालिटी येथील डॉक्टरांनी सिटीस्कॅन व इतर तपासण्या केल्यानंतर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. कॅन्सर हॉर्मोन सीए 125 जे साधारण 35 च्या खाली हवे, ते रुग्ण महिलेमध्ये 1 हजारपेक्षा जास्त वाढलेले होते. रक्त अत्यंत कमी असल्याने 2 रक्त पिशव्या देण्यात आले. डॉक्टरांना शस्त्रक्रिया करतांना लहान मोठ्या आतड्या, पोटावरील चरबीचा पडदा सगळे ट्यूमरला चिपकलेले होते. ही शस्त्रक्रिया तब्बल 4 तास चाललेली असून, 24.4 किलोचा कॅन्सरचा गोळा काढण्यात आला. डाव्या अंडाशयाचा कॅन्सर असल्याचे आढळून आले. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली. यामध्ये विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात स्त्री कर्करोग विषेतज्ज्ञ डॉ. भावना सोनटक्के यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. भूलतज्ज्ञ डॉ. सचिन गोंडाणे, डॉ. चेतन देऊळकर, ओटी इंचार्ज बिल्कीस सिस्टर, डॉ. माधव धोपरे, शितल बोंडे, कोमल खाडे, जया वाघमारे, अपेक्षा वाघमारे, शंकर, गोविंद, लक्ष्मी यांनी सहभाग घेतला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजुला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# महाकुंभ : स्थानिकांची मोठी गोची

प्रयागराज महाकुंभादरम्यान ५९ कोटींहून अधिक लोकांनी संगमात स्नान केले आहे. यामुळे शहरी लोकांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोक एका प्रकारे त्यांच्याच घरात 'कोंडलेले' आहेत. शहरातील एका चौकातून दुसऱ्या चौकात जाण्यासाठी लोकांना ४ ते ५ तास लागत आहेत. याशिवाय, दूध आणि ब्रेडसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळण्यात खूप अडचण येते. उत्तर प्रदेश बोर्डाने 24 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. त्या दिवसाची परीक्षा नंतर घेतली जाईल.




**1** शाळा बंद आहेत. बोर्डाच्या परीक्षा आहेत. ऑनलाइन अभ्यास सुरू आहेत. मुले तयार होत नाहीत.

**2** ऑटो, ई-रिक्षा उपलब्ध नाहीत. तुम्हाला मिळत असेल तर ते भरले आहे. लोकांना तुकड्या तुकड्यांमध्ये प्रवास करावा लागतो.

**3** कामावर जाण्यासाठी दोन तास आधी घर सोडावे लागेल. पोहोचायलाही दोन ते तीन तास लागतात.

**4** दुकानांचा माल संपला आहे. बॅरिकेड्स आणि जाममुळे ग्राहक येत नाहीत.

**बंद** शहरातील गजबजलेल्या भागात डिलिव्हरी ॲप्सने काम करणे बंद केले आहे. ऑर्डर घेत नाही. याची दोन कारणे आहेत. प्रथम - जाम, दुसरा - वेअरहाऊसमध्ये उत्पादन संपत आहे.

२६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री स्नानाने महाकुंभ मेळाव्याची सांगता होईल. आजपासून महाकुंभमेळ्याला फक्त ३ दिवस उरले आहेत, आतापर्यंत ५९ कोटींहून अधिक भाविकांनी महाकुंभात स्नान केले आहे. मौनी अमावस्येला झालेल्या चेंगराचेंगरीनंतर प्रशासनाच्या कडक कारवाईमुळे बहुतेक भाविकांनी यात्रा पुढे ढकलली होती.

अशा परिस्थितीत, आता संगममध्ये स्नान करण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक प्रयागराजला पोहोचत आहेत. आठवड्याच्या शेवटी आणि मुख्य स्नान उत्सवाच्या दिवशी सर्वाधिक गर्दी जमते. सामान्य दिवसांमध्ये, दररोज सरासरी १ कोटीहून अधिक भाविक महाकुंभात पोहोचत असतात. ३ फेब्रुवारी रोजी महाकुंभात वसंत पंचमीच्या अमृत स्नानानंतर, संन्याशांचे सर्व सात आखाडे महाशिवरात्रीसाठी बनारसला रवाना झाले. १२ फेब्रुवारी रोजी माघी पौर्णिमेला स्नान करून इतर संत आणि ऋषी देखील त्यांच्या मूळ गावी निघाले. आता महाकुंभमेळ्याला गेलात तर आखाड्यांची जागा रिकामी आढळेल. याशिवाय, विविध आश्रमांचे मंडपही तोडण्यास सुरुवात झाली आहे. सध्या, जुना आखाड्यातील सुमारे १० नागा साधू सेक्टर २० मध्ये दिसतील. हे नागा साधू २६ फेब्रुवारी नंतर जातील.



गर्दी असल्याने सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी आहे. शहराबाहेरून येणारी वाहने १०-१२ किलोमीटर अंतरावर असलेल्या पार्किंगमध्ये थांबवली जात आहेत. संगमपर्यंत जत्रेच्या परिसरात चालत जावे लागते किंवा स्थानिक वाहनांच्या मदतीने पोहोचावे लागते. कुंभमेळ्यातील प्रत्येक यात्रेकरू सरासरी १२ किलोमीटर चालत असतो. मेळ्यात फक्त पास घेऊनच वाहनांना प्रवेश दिला जातो. याशिवाय, व्हीआयपी गाड्यांसाठी वेगळे प्रोटोकॉल आहेत. महाकुंभमेळ्यातील तंबू भरले आहेत. त्यापैकी बहुतेकांसाठी प्री-बुकिंग २६ फेब्रुवारीपर्यंत आहे. हॉटेल्सही जवळजवळ भरली आहेत.

---

शहरातील रस्त्यांवर बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. त्यामुळे जवळपास राहणाऱ्या लोकांना अडचणी येत आहेत. प्रयागराज येथील ५० वर्षीय विद्यासागर मिश्रा म्हणतात, माझ्या आयुष्यात आजपर्यंत घराबाहेर रस्त्यावर कधीही वाहतूक कोंडी झालेली नाही. मी जवळजवळ ५० वर्षांपासून या शहरात राहत आहे. पण आता परिस्थिती अशी आहे की आपण घराबाहेर पायीही जाऊ शकत नाही. आता महाकुंभाची प्रसिद्धी थांबवली पाहिजे आणि लोकांना येथे येण्यापासून रोखले पाहिजे. हे सर्वांच्या हिताचे आहे. येथे वर्षानुवर्षे राहणारे लोकही त्याबद्दल उघडपणे बोलत आहेत.

विविध ठिकाणी बॅरिकेडिंगमुळे लोकांना त्यांचे दैनंदिन काम करता येत नाही. अमृत स्नान संपल्यानंतर शहरात गर्दी कमी होईल असे मानले जात होते, परंतु तसे होताना दिसत नाही. दररोज एक कोटींहून अधिक भाविक येत आहेत. प्रयागराज शहरातील लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

शहरातील जवळजवळ सर्व शाळा बंद आहेत. दोन महिन्यांपासून हीच परिस्थिती आहे. ऑनलाइन वर्ग सुरू आहेत. प्रशासनानेही जाहीर केले आहे की जर परीक्षा चुकली तर ती दुसऱ्या तारखेला घेतली जाईल. विद्यार्थी आणि शिक्षक वेळेवर महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे अभ्यासावर परिणाम होत आहे. योग्य वर्ग घेतल्याशिवाय अभ्यास कसा करायचा? हा प्रश्न विद्यार्थ्यांना भेडसावतो आहे.

स्थानिक लोकांसमोर आणखी एक मोठी समस्या आहे. गरज असताना त्यांना ऑटो आणि ई-रिक्षाही मिळत नाहीत. यामुळे त्यांना कुठेही जाता येत नाही. विद्यार्थिनी झैनब म्हणते, अनेक स्पर्धा परीक्षा घेतल्या जात आहेत, ज्यांचे केंद्र १० किमीच्या आत दिले जातात. त्या केंद्रांवर पोहोचण्यासाठी लोकांना वाहतुकीचे अनेक मार्ग बदलावे लागतात. त्यानंतरही काही लोक वेळेवर पोहोचू शकत नाहीत. तसेच, प्रचंड गर्दी आणि वाहतूक कोंडीमुळे, डिलिव्हरी ॲप्स देखील शहरात वस्तू पोहोचवत नाहीत.

एखाद्याची तब्येत बिघडल्यावर रुग्णालयात पोहोचणे हे एका आव्हानापेक्षा कमी नाही. उपचार घेण्यापूर्वीही लोकांना दहा वेळा विचार करावा लागतो. अतुल न्याय म्हणतात, स्थानिक लोकांसाठी सर्वात मोठी समस्या म्हणजे ते बाहेर जाऊ शकत नाहीत. आपण कोणत्याही कामासाठी बाहेर जाऊ शकत नाही किंवा फिरायलाही जाऊ शकत नाही. जरी आपण बाहेर पडू शकलो तरी एका चौकातून दुसऱ्या चौकात पोहोचण्यासाठी ४-५ तास लागतात. हा खूप मोठा प्रश्न आहे.

शहरात गाडी बाहेर काढणे खूप कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी तर सायकल चालवणेही कठीण झाले आहे. याशिवाय, येथील स्थानिक लोक बाहेरून येणाऱ्या लोकांचे स्वागत करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत. प्रत्येकजण शक्य तितकी मदत करत आहे.

दुकानदारांनाही अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ब?याच वेळा वस्तूंच्या कमतरतेमुळे आपल्याला आपली दुकाने बंद करावी लागतात. गर्दी अचानक वाढल्यामुळे दुकानांमधील साहित्य संपण्याच्या मार्गावर आहे. दैनंदिन वापराच्या वस्तू दुकानांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. या कारणास्तव बहुतेक दुकानदारांना त्यांची दुकाने बंद करावी लागत आहेत.

दुकानदार धर्मेंद्र त्रिपाठी म्हणतात, 'इतक्या गर्दीमुळे व्यवसायात खूप समस्या येत आहेत. हे गैरवर्तन स्टेशनकडे जात असल्याने सर्व रस्ते सील करण्यात आले आहेत. त्यामुळे ये-जा करण्यात खूप अडचण येते. आपल्याला येणारा लांब मार्ग स्वीकारावा लागेल. शिवाय, वस्तू पोहोचवण्यात खूप अडचण येते.

जे काही छोटे सामान आणता येते ते पायीच आणले जाते, वाहतुकीचे दुसरे कोणतेही साधन नाही. रस्त्यांच्या सुरुवातीला बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत, त्यामुळे ग्राहक येऊ शकत नाहीत. सध्या फक्त १०% व्यवसाय सुरू आहे.

दुकानदार अनुज जयस्वाल म्हणतात, वाहतूक कोंडीची समस्या गंभीर आहे. दुकानात महिनाभरापासून कोणताही माल नाही. संपूर्ण दुकान रिकामे झाले आहे. असे झाल्यास, लोकांना अन्न मिळण्यातही अडचणी येऊ शकतात. या कारणामुळे वस्तूंचा काळाबाजारही होत आहे. दुकानदारांना जास्त किमतीत वस्तू मिळत आहेत, त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान होत आहे. जवळजवळ सर्वत्र दुकाने रिकामी आहेत, फक्त दूध आणि ब्रेड उपलब्ध आहेत.

व्यापारी राजेश चौरसिया म्हणाले, प्रयागराजची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे अराजक झाली आहे. आता इतक्या मोठ्या संख्येकडे पाहता असे दिसते की हा संपूर्ण महिना असाच जाईल. २९ जानेवारी रोजी मौनी अमावस्येला जत्रेत जी गर्दी होती, तीच गर्दी आजही दिसून येते.

जनता सहमत नाही. ते म्हणाले, आम्ही जनतेला हात जोडून विनंती करत आहोत की त्यांनी त्यांच्या भेटी कमी कराव्यात. गंगा आई कुठेही जात नाही. तुम्ही सर्वजण नंतर या आणि संगमात स्नान करा. यावेळी सर्वत्र मोठी गर्दी असते. वाहतुकीची साधने उपलब्ध नाहीत.

ऑफिसला जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन तास आधी निघावे लागते. परत येण्यासाठी आणखी दोन ते तीन तास लागतात. अशा परिस्थितीत, सामान्य माणसाची सामान्य कामाची पाळी १३-१४ तासांची झाली आहे. वैद्यकीय कर्मचारी पूजा म्हणते, महाकुंभामुळे मला दररोज किमान ७-८ किलोमीटर किंवा त्याहून अधिक चालावे लागते. यामुळे आपण वेळेवर रुग्णालयात किंवा घरी पोहोचू शकत नाही. त्यामुळे रुग्णांनाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आम्ही कधीच कल्पना केली नव्हती की इतकी गर्दी होईल.

**न्यायालयीन सुनावणीत अडचणी**

जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयात पोहोचण्यासाठी वकिलांना खूप अडचणी येत आहेत. यामुळे खटल्यांच्या सुनावणीतही अडचणी येत आहेत. अधिकाऱ्यांविरुद्ध दररोज गंभीर वॉरंट जारी केले जात आहेत आणि त्यांची सुनावणी करण्यात अडचणी येत आहेत. वकिलांचे म्हणणे आहे की सरकार प्रयागराजमधील वाहतूक कोंडी सोडवत नाही आणि इथे येणाऱ्या लोकांना योग्य मार्ग दाखवू शकत नाही.

एकूणच काय तर, श्रद्धेच्या नावावर स्थानिकांची मोठी गोची केली जात आहे.

---

# ....तरच मातृभाषा संपन्न होईल!

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत.

मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणा?या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टो?यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुस?या दिवशी पुन्हा येरे माज्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वाढू लागले आहे.

पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत.

लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले.

बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे.

काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पयार्यी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पयार्यी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत.

पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या.

'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा.

आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

■ ■ ■

---

# नवीन इन्कमटॅक्स कायदा २०२५ कसा आहे?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

आपण गेल्या काही आठवड्यापासून जुन्या इन्कमटॅक्स कायद्याची चर्चा मुद्दाम थांबवली होती कारण आता नवीन कायदा 2025 म्हणजे नुकताच पास झाला आहे. 1961 नंतर पहिल्यांदाच 2025 मध्ये पूर्ण कायदाच बदलण्याचा प्रस्तावआलेला आहे. 63 वर्षा नंतर पूर्ण कायदाच बदलण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. आपण आज पासून नेहमीप्रमाणे सोप्या प्रश्नोतर रुपात नवीन कायदा बघणार आहोत. जे सर्व वाचकांना उपयोगी ठरावा.

**प्रश्न : इन्कमटॅक्स चा जुना कायदा बदलून नवीन कायदा का आणला गेला?**

■ 13 जुलै 2024 च्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी याचे उत्तर असे दिले की नवीन कायदा सुटसुटीत व स्पष्ट तथा संक्षिप्त करण्यात आलेला आहे. हे बिल 13 फ्रेब्रुवारी 2025 ला पार्लमेंट मध्ये मांडण्यात आला.

**प्रश्न : जुन्या व नवीन इन्कमटॅक्स कायद्यात महत्त्वाचा दर्शनीय फरक काय आहे?**

■ 1) नवीन कायद्यात जवळपास 2 लाख 56 हजार शब्द आहे जे की जुन्या कायद्यात हेच शब्द डबल होते. आता शब्द अर्धे झाले असेल तरी सार मात्र पूर्ण आहे. जुन्या कायद्यात 911 सेक्शन आणि 11 शेड्युल होते. जे आता 536 शेक्शन ( क्लॉजेस) तथा 16 सेड्युल आहेत. म्हणजेच 300 पेक्षा जास्तीचे विनाकारणंची भरती असलेले शेक्शन हटवण्यात आलेले आहेत.

**प्रश्न : जुन्या कायद्यात प्रीवियस ईयर आणि असेसमेंट ईयर असे होते त्यात आता काय बदल केला आहे?**

■ नवीन कायद्यात प्रीवियस ईयर आणि टॅक्स ईयर शब्द काढून टाकण्यात आले असून या जागी टॅक्स ईयर आणि सबसीक्वेन्ट टू टॅक्स ईयर असा बदल करण्यात आला आहे. हा नवीन बदल अर्थाप्रमाणे बरोबर असून ब्रिटीश कालीन शब्द प्रीवियस ईयर आणि असेसमेंट ईयर काढून टाकले गेल्यामुळे जनतेस कायदा समजण्यास सोपा जाईल, असेही अर्थमंत्री बोलले.




नवीन कायद्यात सोपे व छोटे वाक्य आहे. जे पूर्वी फार लांब असायचे व त्यातून वेगवेगळे कायद्याचे किस म्हणजे अर्थ निघायचे जुन्या कायद्यातील not with standing असे खूप शब्द घेतले ते आता जवळ जवळ काढून टाकण्यात आले आहे पूर्वीच्या कायद्यात 47 चाप्टर होते ते आता फक्त 23 करण्यात आलेले आहे यामुळे कायदा स्पष्ट व सुटसुटीत होईल यात शंका नाही.

काही तज्ञांची मते यावर भिन्न आहेत त्यांची मते खालील प्रमाणे आहेत.

1) त्यांच्या मते नवीन कायद्यात आणि जुन्या कायद्याची पॉलिसी बदल नाही. स्ट्रक्चर बदल ही नाही. फक्त पान कमी करण्यात आले असून हे फक्त old wine in new bottle असा प्रकार आहे.

2) नवीन सेक्शन टाकल्या मुळे प्रत्येकाला नवीन कायद्याची सुरुवाती पासून अभ्यास लागेल. म्हणजे फक्त Reinventing the wheel.

3) Computation मध्ये काहीच महत्त्वाचे बदल नाहीत.

4) नवीन कायद्याचे पूर्ण आकलन होई पर्यंत कमीत कमी दोन डिकेड म्हणजे तब्बल 20 जाणार.

5) हर बिल सुद्धा लांबच आहे ज्याला अजून छोटा करता आले असते.

6) कम्प्लीट कायदा पुन्हा नवीन रीतीने समजण्यास सगळ्यांनाच वेळ लागेल.

7) शेड्युल खूप टाकण्यात आले आहे जे समजण्यास अवघड जाणार आहे.

सारांशमध्ये 2025 चा नवीन कायदा हा नक्कीच पूर्वीपेक्षा चांगला राहील. पुढच्या आठवड्या पासून आपण एक-एक विषय घेऊन नवीन कायदा काय म्हणतो जुना कायदा या विषयावर काय सांगत होता, तथा दोन्हीत काय बदल आहे, तथा नवीन बदल कसा चांगला आहे किंवा नाही याचे सविस्तर उदाहरण करणार आहोत, जे करदात्यांना तथा वाचकांना खूप उपयोगी राहील. ■ ■

---

# पालकचे पाणी, भलतेच गुणकारी..

## आरोग्याला अनेक फायदे



निरोगी आरोग्यासाठी तुमच्या आहारात पोषक तत्वांचा समावेश करणे गरजेचे असते. पालकचे सेवन आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असते. पालकमध्ये भरपूर प्रमाणात लोह, मॅग्नेशियम आणि इतर पोषक घटक असतात. पालक धुतलेल्या पाण्याचा वापर केल्यास कुंडीतील फुले आणि भाज्यांची योग्य वाढ होते.

पालकचे पाणी झाडांसाठी वापरल्यामुळे ते हिरवेगार आणि टवटवीत दिसू लागतात. पालकमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते ज्यामुळे वजन नियंत्रित राहाते आणि त्याध्ये पालकमध्ये काही टक्के पाणी असते ज्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही आणि शरीर हायड्रेटेड राहाते. पालक ज्या पाण्यामध्ये उकळली जाते त्या पाण्यामध्ये अनेक पोषक तत्वं असतात. ज्यामुळे तुमच्या आरोग्याला अनेक फायदे होतात.

पालकच्या पाण्याचे सेवन केल्यामुळे वजन नियंत्रित राहाते आणि शरीरातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. स्वयंपाकघरातील पालक स्वच्छ धुवा आणि पाण्यामध्ये उकळून घ्या. त्यानंतर ते पाणी एका ग्लासमध्ये ठेवा, त्यामध्ये काळे मीठ किंवा सैंधव मीठ मिसळा. या पाण्याची चव वाढवण्यासाठी थोडी काळी मिरी पावडर मिसळा. या पेयाचे सेवन केल्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी वितळू लागते आणि वजन कमी होण्यास मदत होते.

पालकाचे पाणी पांढऱ्या केसांना काळे करण्यास मदत करते. या पाण्यात लोहाचे प्रमाण चांगले असते जे रक्ताभिसरण सुधारण्यास आणि कोलेजन वाढवण्यास मदत करते. याशिवाय, त्यातील प्रथिने केसांच्या वाढीसह रंग राखतात ज्यामुळे केस राखाडी होत नाहीत आणि बराच काळ काळे राहतात.

पालकाच्या पाण्यात नैसर्गिकरित्या आढळणारे नायट्रेट्स असतात, ज्यामुळे तुमच्या रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधाते. अशाप्रकारे, उकडलेले पालक पाणी पिल्याने शरीराचे डिटॉक्सिफिकेशन होण्यास मदत होते. पालकचे पाणी पिल्याने शरीरातील साचलेली अशुद्धता बाहेर पडते आणि चरबीचे प्रमाण कमी होते. यामुळे त्वचेचे छिद्र आतून स्वच्छ होतात आणि रक्तही शुद्ध होते.

पालकचे पाणी प्यायल्यामुळे त्वचेचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते. पिंपल्स, काळे डाग आणि मुरूम सारख्या समस्या असतील तर पालकच्या पाण्याचे सेवन करू शकता. तुम्हाला बद्धकोष्ठता किंवा पोटाच्या समस्या असतील तर आठवड्यातून 2-3 वेळा पालकच्या पाण्याचे सेवन करणे फायदेशीर ठरेल. पालकाचे पाणी प्याल्याने वजन वाढत नाही आणि शरीरामध्ये जास्त प्रमाणात कॅलरीज वाढत नाही. ■ ■ ■

---

## वाचक लिहितात

### आता बळी कोणाचा देणार?

पूर्वी पुतळयाचे शहर म्हणून ओळखले जाणारे नागपूर शहर आता उड्डाणपुलाचे शहर म्हणून नावारूपास येते की काय? अशी शंका येवू लागली आहे. शहरात सर्वत्र उड्डाणपुलांचे काम धडाक्यात सुरू आहे. परंतु, घाईगर्दीत ही कामे करताना त्यांचा दर्जा उत्कृष्ट राखला जातो काय? याकडे प्रामाणिकपणे लक्ष पुरविले जात असल्याचे वाटत नाही.

केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांच्या विभागाने बांधलेल्या आणि दोन दिवसांपूर्वी उद्घाटन झालेल्या पारडी उड्डाणपुलाचे प्लास्टर खचल्याचे वाचण्यात आले. दीर्घकाळ लांबलेल्या आणि निकृष्ट दर्जाच्या कामासाठी कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करा, असे मंत्री महोदय अनेकदा सांगतात. आता त्यांच्याच खात्यात हे असे प्रकार होत असतील तर दोष कुणाला देणार? नागपूरला विकसीत आणि सुंदर शहर बनविण्याच्या नादात लोकांच्या जिवीताशी खेळण्याचा प्रकार होवू नये, एवढी रास्त अपेक्षा.

• विनोद कुंभलकर, नागपूर.

### पुरस्कारप्राप्त आयुक्त करतात तरी काय?

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त सिंगल साहेबांना उत्कृष्ट सेवेबद्दल नुकताच राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करण्यात आला. मात्र, ते कार्यरत असलेल्या नागपूर शहराचे क्राईम कॉपिटल म्हणून रूपांतर झाल्याचे दिसत आहे. नागपुरात एकामागे खूनाच्या घटना घडत असून, गुन्हेगारीने कळस गाठला आहे. चोऱ्या, मारामाऱ्या, देहविक्री व्यवसाय अशा सामान्य गुन्ह्यांमध्ये दुर्लक्ष केले तरी, हत्येच्या घटना नित्याच्या झाल्याचे दिसते. याचाच अर्थ, आयुक्तांच्या अखत्यारीतील पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी त्यांची भूमिका योग्यरित्या निभावत नाही.

जानेवारी, फेब्रुवारी या दोन महिन्यात ३० पेक्षा अधिक खून झालेत. काही प्रकरणातील आरोपी फरार आहेत. हेच नागपूर गृहमंत्र्यांचेही शहर आहे. नागपूर शहरातील गुन्हेगारी मोडून काढण्याकडे आयुक्तांनी लक्ष पुरवायला हवे.

• मिनाक्षी खंडाईत, नागपूर.

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### यशस्वी भव !!

प्रारंभ झाला परीक्षोत्सवाला
आनंदाने जावे स्वागताला
कर्मयोगीचे व्हा पुरस्कर्ते
यश हमखास पदरी पडते ..

' यशस्वी भव ' ही असे
शुभेच्छेची परंपरा
पण आधी कष्ट मग फळ
हाच सापडे बोध खरा ..

वेळेचे काम वेळेवर करी
त्याला टेन्शन नसे शिरी
यश हमखास येते पदरी
भविष्यकाराची काय जरुरी ?

# सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट इंडिया, बेंगळुरूकडून कर्नाटकमधील पहिल्या विमेन-ओन्ली इंजीनिअरिंग कॉलेजमध्ये सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसचे उद्घाटन



**बेंगळुरू, २२ फेब्रुवारी :** सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट इंडिया, बेंगळुरू (एसआरआय-बी)ने कर्नाटकमधील पहिले ऑल-विमेन्स इंजीनिअरिंग कॉलेज गीता शिशू शिक्षण संघ (जीएसएसएस) इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नालॉजी फॉर विमेन, म्हैसूर येथे सॅमसंगचा प्रमुख जागतिक नागरिकत्व उपक्रम सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस (एसआयसी)चे उद्घाटन केले. या उपक्रमामधून एसटीईएममध्ये लैंगिक समानतेला चालना देण्याप्रती आणि तंत्रज्ञानामध्ये महिला प्रमुखांच्या नवीन पिढीला चालना देण्याप्रती सॅमसंगची अविरत कटिबद्धता दिसून येते.

सॅमसंगमध्ये आमचा विश्वास आहे की, संधी सर्वसमावेशक असल्यास इनोव्हेशन प्रगत होऊ शकते. कर्नाटकमधील पहिल्या विमेन्स इंजीनिअरिंग कॉलेजमध्ये सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस (एसआयसी)चे उद्घाटन करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटत आहे, जेथे तरूण विचारवंत एक्स्प्लोअर, प्रयोग करतील आणि तंत्रज्ञानाच्या मर्यादांना दूर करतील. सरकारच्या #DigitalIndia व #MakeinIndia मोहिमांशी संलग्न राहत हा कॅम्पस विद्यार्थ्यांना देशामधून तंत्रज्ञान प्रगतीला गती देण्यास सक्षम करतो. आम्ही महिला प्रमुखांना निपुण करण्यास उत्सुक आहोत, जेथे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निर्मिती, नाविन्यता आणि जगामध्ये परिवर्तन घडवून आणतील,'' असे एसआरआय-बीचे कॉर्पोरेट उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मोहन राव गोली म्हणाले.

एसआरआय-बी सोबतचा आमचा सहयोग अधिक प्रभावाची खात्री देतो, तसेच कॅपस्टोन प्रकल्पांच्या माध्यमातून उद्योग-संबंधित कोर्सेस व सर्वोत्तम कौशल्ये, प्रबळ टेक्निकल प्राया आणि व्यावहारिक एक्स्पोजर देतो. हा उपक्रम डिजिटल कौशल्यांमधील तफावत दूर करत आणि महिलांना भावी कर्मचारीवर्गासाठी सुसज्ज करत #DigitalIndia ला पाठिंबा देण्याप्रती आमची कटिबद्धता दृढ करतो. संरचित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समस्या-निवारण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांमधील प्रत्यक्ष अनुभव मिळेल, ज्यामुळे रोजगारक्षमता आणि नाविन्यतेमध्ये वाढ होईल. आम्ही या बहुमूल्य सहयोगासाठी एसआरआय-बीचे कौतुक करतो, जी तरूण महिला टेक्नॉलॉजिस्ट्सना तंत्रज्ञान प्रगतीला चालना देण्यास सक्षम करते,'' असे जीएसएसएस (आर), म्हैसूरच्या सचिव अनुपमा बी. पंडित म्हणाल्या.

एसआरआय-बीने कर्नाटकमधील सात इतर इन्स्टिट्यूट्ससह बीएनएम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, केम्ब्रिज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (मेन अँड नॉर्थ कॅम्पसेस), डॉन बॉस्को इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, केएलई इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, आरएनएस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आरएनएसआयटी) बेंगळुरू येथे एसआयसी स्थापित केल्या आहेत, तसेच आयआयआयटी-कुर्नूलमध्ये एक एसआयसी स्थापित केले आहे, जे तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंधित संधींचा फायदा घेण्यासाठी ८०० हून अधिक विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देते.

# अदानी फाऊंडेशनच्या नेत्र शिबिरात २२६ लोकांची तपासणी




**नागपूर, २२ फेब्रुवारी :** मानवी जीवनात डोळ्यांचे फार मोठे महत्त्व आहे. हेच डोळे निरोगी राहावेत या हेतूने वडधामना गावात नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अदानी फाऊंडेशन, प्रेरणा विकास सोसायटी आणि वडधामना ग्रामपंचायतच्या वतीने पार पडलेल्या शिबिरात २२६ लोकांनी आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली.

यावेळी डॉ. अंकित पोटे, डॉ. कृणाल कपाटे, सरपंच धीरज आंबटकर, उपसरपंच श्याम राव, प्रेरणा विकास सोसायटीचे पद्माकर बुरुरे, हिमांशु तागडे, अभिषेक वाघ, मयूर अतकरी उपस्थित होते. शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी शिबिरात सहभागी लोकांच्या डोळ्यांची तपासणी केली. शिवाय इतरही तपासण्या करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना सहजतेने वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी म्हणून या शिबिराचे आयोजन केल्याची माहिती अदानी फाऊंडेशनने दिली.

दरम्यान, ज्यांच्या डोळ्यांना नंबरचे चष्मे लागतील, त्यांना पुढील शिबिरात विनामुल्य त्याचे वाटप केले जाणार आहे. बहुतांश लोकांना जवळचे दिसत नसल्याचेही डॉक्टरांच्या तपासणीअंती समोर आले. त्यांच्यावर योग्य तो उपचार केला जाणार आहे. याशिवाय रक्तदाब, मधुमेह आणि इतरही चाचण्या शिबिरात करण्यात आल्या.

अदानी फाउंडेशन ग्रामीण विकास आणि आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्यासाठी सतत कार्यरत राहतात. अशा सामाजिक मोहिमांद्वारे गावांमध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि लोकांना त्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक करणे हे फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे. हे नेत्र तपासणी शिबिर देखील अदानी फाउंडेशनच्या या संकल्पाचा एक भाग होता.

# जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांना AIMA मॅनेजिंग इंडिया अॅवॉर्ड्समध्ये दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी पुरस्कार प्रदान




**नवी दिल्ली, २२ फेब्रुवारी :** जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांना १५ व्या AIMA मॅनेजिंग इंडिया अवॉर्ड्समध्ये प्रतिष्ठेच्या दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार म्हणजे समूहाला जागतिक स्तरावरील मोठ्या उद्योग समूहामध्ये विस्तारण्याच्या त्यांच्या परिवर्तनात्मक नेतृत्वाला मिळालेली मान्यता आहे.

आज झालेल्या समारंभात जिंदाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि सन्माननीय अतिथी म्हणून वाणिज्य आणि उद्योग; इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी विभागाचे राज्यमंत्री जितिन प्रसाद उपस्थित होते. पुरस्काराच्या सन्मानपत्राचे वाचन केपीएमजी इंडिया चे मुख्य कार्यकारी अधिकारी यझदी नागपोरेवाला यांनी केले.

जिंदाल यांच्या नेतृत्वाखाली जेएसडब्ल्यू समूहाने उल्लेखनीय वाढ साध्य केली असून कंपनीचे उत्पन्न दुपटीहून अधिक वाढून २४ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचले आहे. त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनामुळे जेएसडब्ल्यू ने वार्षिक स्टील उत्पादन क्षमता जवळपास तिप्पट करून ३९ दशलक्ष टनांपर्यंत वाढवली आहे. तसेच, जेएसडब्ल्यू ने अक्षय ऊर्जा आणि सिमेंट उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

या पुरस्कारातून जेएसडब्ल्यू समूहाला भारताच्या पायाभूत सुविधा आधुनिकीकरण उपक्रमांशी जोडण्यात असलेली जिंदाल यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित होते. त्यांच्या नेतृत्वाखाली, जेएसडब्ल्यू भारतातील खाजगी क्षेत्रातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी पोर्ट ऑपरेटर कंपनी म्हणून उदयास आली आहे. तसेच, कंपनीने आंतरराष्ट्रीय भागीदारीद्वारे इलेक्ट्रिक वाहन आणि लष्करी ड्रोन यांसारख्या भविष्यातील क्षेत्रांमध्ये प्रवेश केला आहे.

ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन (AIMA) मॅनेजिंग इंडिया अवॉर्ड्स भारताच्या व्यावसायिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाचा सन्मान करतात. या पुरस्कार सोहळ्याच्या १५ व्या सत्रासाठी विविध नामांकित पुरस्कार विजेते, उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि AIMA चे पदाधिकारी एकत्र आले होते.

# सृती झा आणि राजश्री ठाकूर एका रोमांचक चित्रीकरणासाठी एकत्र!

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** झी टीव्हीवरील 'कैसे मुझे तुम मिल गये' आणि 'बस इतना सा ख्वाब' या मालिकांनी त्यांच्या आकर्षक कथाकथन आणि नाट्यमय आकर्षणासह प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. एका खास महासंगम एपिसोडसह ते एकत्र येत असून दोन्ही मालिकांमधील कलाकार एका अविस्मरणीय मनोरंजनात्मक कार्यक्रमासाठी उत्साहित आहेत.

आगामी एपिसोड्समध्ये अमृता (सृती झा) आणि अबीर (पुलकित बांगिया) यांच्या लग्नामुळे नाट्यमय वातावरण निर्माण होईल कारण रणवीर (अर्जित तनेजा उर्फ विराट) याचा जळफळाट झाला आहे. अमृताचा अबीरशी लग्न करण्याचा निर्णय हा त्याच्या हरवलेल्या स्मरणशक्तीला परत मिळवून देण्यासाठी आहे हे रणवीरला माहिती नसते. समारंभादरम्यान अमृताला तिची जवळची मैत्रीण अवनी (राजश्री ठाकूर) साथ देते. ती तिला तयार होण्यास आणि तिचा मेकअप करण्यास मदत करते. या सर्व नाट्यामध्ये भर घालत अमृताचे सासरे शिखर (योगेंद्र विक्रम सिंग) आणि तमन्ना (छवी पांडे) यांना या समारंभासाठी निमंत्रित करतात. मात्र, तमन्ना शिखरचे मन जिंकण्याचा आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांचे भविष्य सुरक्षित करण्याचा दृढनिश्चय करण्याच्या हेतूनेच येते. दरम्यान, मानवी (आकांक्षा चमोला) रणवीर आणि अमृता यांना वेगळे ठेवण्यासाठी कट आखते.

सृती झा म्हणाली, या महासंगम भागाबद्दल मी खूप उत्सुक आहे. आता मालिकेमध्ये काही प्रमुख घटना घडण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असून बस इतना सा ख्वाबची टीम आमच्यात सामील झाल्याने ही वाटचाल आणखी खास बनली आहे. राजश्री ही अशी व्यक्ती आहे जी माझ्यासाठी आदर्श आहे आणि अमृताच्या आयुष्यातील या महत्त्वाच्या क्षणाचा ती अवनी म्हणून हिस्सा बनू शकते याचा मला खूप आनंद झाला. ती एक प्रतिभावान कलाकार आहे आणि तिच्यासोबत काम करताना मजा येते. ही दृश्ये अतिशय गंभीर असली तरीही आम्ही खूप मजा केली आणि उत्साह कायम ठेवला. मला आशा आहे की प्रेक्षकांना हा भाग आणि आता उलगडणाऱ्या नाट्याची मजा येईल.

राजश्री ठाकूर म्हणाली, महासंगम एपिसोड्स खरोखरच रोमांचक आहेत आणि अमृताच्या लग्नादरम्यान तिच्यासोबत असणे हा एक अद्भुत अनुभव होता. दृश्ये नाट्यमयतेने भरलेली असली तरी सेटवर कधीही कंटाळवाणा क्षण आला नाही. माझ्यासाठी ते खूप खास होते कारण मी अमृताला तिच्या मेकअपमध्ये मदत केली आणि तिला या महत्त्वाच्या क्षणासाठी तयार केले. सृती आणि अर्जितसोबत शूटिंग करणे खूप मजेदार होते - आमच्यात इंडस्ट्रीबद्दल खूप गप्पा झाल्या आणि एकत्र शूटिंगचे हे तीन दिवस खरोखरच छान होते. मला आशा आहे की जितका आनंद आम्हाला शूटिंग करण्यात आला तितकाच आनंद प्रेक्षकांना हे एपिसोड्स पाहताना होईल!

मानवी आणि तमन्नाची योजना यशस्वी होईल का? अवनीला शिखर आणि तमन्नाबद्दल कळेल का? रणवीर (विराट) त्याची स्मृती परत मिळवेल का? येणाऱ्या भागांमध्ये हे नाट्य पाहणे प्रेक्षकांसाठी रोमांचक असेल.

# तेनाली रामामध्ये तेनाली रामापुढे भयंकर आव्हान ; लछमाचे जीवन अधांतरी

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या एका दरबारी कवी आणि अत्यंत चतुर व्यक्तिरेखेच्या सुरस कथांनी प्रेक्षकांचे खूप मनोरंजन करत आहे. अलीकडच्या भागांमध्ये, लहान मुलांच्या टोळीतील लछमा (आरिया सकरिया) ला विषारी रसायनाने माखलेला हत्ती दिसतो. या रसायनाचा पाण्याशी संपर्क आल्यावर भयंकर प्रतिक्रिया होत असल्याचे रामाला समजते.

आगामी भागांमध्ये या रहस्यमयी हत्तीच्या रूपाने कोणते संकट येऊ घातले आहे, हे सगळ्यांना समजावण्याचा प्रयत्न करतो. पुढे कृष्णदेवराय राजाला (आदित्य रेडिज) हे समजते की हे शत्रूने वापरलेले एक साधन आहे. ते सगळे मिळून त्या हत्तीला एका खड्ड्यात ढकलतात. रामाचे कौतुक होते आणि लोक त्याची क्षमा मागतात. पण शोकांतिका त्यानंतर चालू राहते. लछमा नकळत त्या हत्तीच्या शरीरावरील विषारी वायू आपल्या श्वासात ओढते आणि आजारी पडते. तेनालीला ती सांगते की याच रसायनामुळे तिच्या आईचा दुर्दैवी मृत्यू झालेला असतो. आता तिचे स्वतःचे जीवन अधांतरी असताना तेनाली तिचा जीव वाचवण्यासाठी रक्तपुष्प फुलाच्या शोधात निघतो. दरम्यान, गिरगिट राज (सुमित कौल) राजा कृष्णदेवरायाला युद्धासाठी डिवचतो आणि तीव्र संघर्षाची परिस्थिती निर्माण करतो.

तेनाली रामा मालिकेत तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, तेनाली रामापुढे एक मोठे संकट उभे आहे. शहरात सोडलेला हत्ती म्हणजे शत्रूचे शस्त्र होते, हे समजल्यावर हत्तीचा निकाल केल्यामुळे संकट टळले असे त्याला वाटते. पण जेव्हा लछमाची प्रकृती ढासळते तेव्हा आणि याच विषाने तिच्या आईचा देखील जीव घेतला होता, हे सत्य त्याला समजते तेव्हा रामा हेलावून जातो. आता त्याला लछमाला तर वाचवायचेच आहे, पण तिला संजीवन देणाऱ्या एका दुर्मिळ फुलाचा शोध देखील घ्यायचा आहे. संकट मोठे आहे. आगामी भागात दिसेल की, विजयनगरची शांती भंग करण्याच्या प्रयत्नात असलेल्या गिरगिट राजचा सामना करण्यासाठी रामाला कशी तयारी करावी लागणार आहे.

# काली मा चे रूप घेताना मला निडरता, आंतरिक शक्ती आणि संकटांवर मात करण्याची क्षमता हे मातेचे गुण अंगिकारण्यास देखील मदत होते : बरखा बिष्ट

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेतील तेनाली (कृष्ण भारद्वाज)च्या वेधक गोष्टींनी प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन होत आहे. तेनाली हा दरबारी कवी होता, जो आपल्या बुद्धीचातुर्याबद्दल ओळखला जात असे. तेनालीला विजयनगर साम्राज्यातील त्याचे स्थान पुन्हा प्राप्त करून देण्यात साक्षात काली मातेची (बरखा बिष्ट) दिव्य शक्ती त्याच्या पाठीशी होती. दिव्य स्वरूपी काली माता तेनालीला शहाणीव आणि संकटांवर मात करण्याची शक्ती देते. बरखासाठी देवीचे रूप साकारणे ही केवळ एक अभिनयाची संधी नसून काली मातेचे संरक्षणात्मक गुण अंगिकारण्याची संधी आहे.

काली मातेची भूमिका करण्याबद्दल आणि तो खास पोशाख धारण करण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतात, याबाबद्दल बरखा म्हणते, मातेचा लुक धारण केला की तिच्यातील निडरता, आंतरिक शक्ती आणि संकटांवर मात करण्याची तिची ताकद हे गुण अंगिकारण्यास देखील मला मदत होते. देवीचे हे दिव्य रूप पडद्यावर साकार करण्यात पोशाख, आभूषणे आणि नाट्यमय मेकअप यांचा मोठा वाटा आहे. तयार होण्याची प्रक्रिया खूप किचकट आणि प्रदीर्घ आहे. या मेकअपसाठी आणि बोजड मुकुट आणि आभूषणे परिधान करण्यासाठी तासन् तास जातात. काली मातेचे व्यक्तिमत्व अस्सल बनवण्यासाठी या सगळ्याचा उपयोग केला जातो.

प्रखर प्रकाशात तासन् तास काम करताना त्वचेची काळजी घेणे महत्त्वाचे होऊन जाते. बरखा स्किनकेअर रूटीनचे काटेकोर पालन करते. ती म्हणते, स्किनकेअर प्रक्रियेतला सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे मेकअप व्यवस्थित उतरवणे. जर मेकअप नीट निघाला नाही, तर तो त्वचेला नुकसान करतो. विशेषतः आम्ही मेकअप करून दिवसभर उन्हात काम करत असल्याने तो पूर्णपणे काढणे गरजेचे आहे. मेकअप काढल्यानंतर व्यवस्थित क्लीन्सिंग आणि मॉईश्चराईझिंगची गरज असते. त्वचा नेहमीच हायड्रेटेड ठेवणे अत्यावश्यक आहे, आणि मेकअप काढताना या दोन्ही गोष्टींचे मी काटेकोर पालन करते.

# वागले की दुनिया मालिकेत सोसायटी सदस्यांना वाचवण्यासाठी राजेश वेळेवर पावले उचलणार का?

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत आपल्याला आपलेसे आणि आकर्षक वाटणारे कौटुंबिक क्षण बघायला मिळतात. सामान्य माणसाच्या जीवनातील दैनंदिन संघर्ष यात दाखवला जातो. प्रेक्षकांनी पाहिले की, साई दर्शन सोसायटीमध्ये एक निनावी पाकीट येते, ज्याच्यावर प्राप्तकर्त्याचे नाव देखील लिहिलेले नसते. सोसायटीच्या सर्व सदस्यांना ते पाकीट आपल्याचसाठी असावे असे वाटते. त्याबद्दल कुतूहल आणि मग गोंधळ वाढतो. जेव्हा रजेवर गेलेला सोसायटीचा वॉचमन परत येतो तेव्हा हे रहस्य उलगडते. तो सांगतो की, त्याच्या गावातील कुणी तरी हे स्मृतिपत्र पाठवले आहे. वॉचमन रजेवर असल्याचे माहीत नसल्यामुळे ते पत्र पाठवल्यावर गोंधळ माजतो. आगामी भागात, हा छोटासा गोंधळ मिटल्यानंतर एक मोठे मोठे वादळ घोंघावत येते. साई दर्शन सोसायटीतील महिला एका आकर्षक आभूषणाच्या योजनेकडे आकर्षित होतात. या योजनेत सोप्या मासिक हप्त्यांमध्ये महागडी आभूषणे देण्याची हमी असते. तसेच दोन वर्षांनी संपूर्ण रक्कम देखील परत मिळणार असते. राजेश (सुमित राघवन) नव्या नोकरीच्या संधी शोधत असतो, तेव्हा त्याला एक धक्कादायक गोष्ट समजते. तो ज्या कंपनीत दाखल होण्याचा विचार करत असतो, ती कंपनी एका महाभयंकर आर्थिक घोटाळ्याच्या केंद्रात असते आणि लोकांकडून पैसे लुबाडून त्यांची फसवणूक करण्याच्या तयारीत असते. साई दर्शन सोसायटीच्या काही लोकांनी तर या योजनेला बळी पडून आधीच आपल्या बचतीचे पैसे त्यात गुंतवून आपली पूंजी धोक्यात टाकलेली असते.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने लँड क्रूझर ३०० साठी बुकिंग सुरू केली



**बंगळुरू, २२ फेब्रुवारी :** टोयोटा किर्लोस्कर मोटरने आज त्यांच्या प्रतिष्ठेचे प्रतीक, सामर्थ्य आणि मजबूत क्षमतेचा वारसा असलेल्या लँड क्रूझर ३०० साठी अधिकृत बुकिंग सुरू करण्याची घोषणा केली. ७० वर्षांहून अधिक काळाच्या त्यांच्या प्रतिष्ठेला डोळ्यासमोर ठेवत बनविण्यात आलेल्या या एसयूव्हीमध्ये टोयोटाच्या अभियांत्रिकी कौशल्याचा सर्वोच्च संगम आहे. ही कार आरामदायी व्यवस्था आणि सर्वच प्रकारच्या रस्त्यांवर वाहन चालविण्याचा आनंद घेण्याची ईच्छा असणाऱ्या वाहनप्रेमींची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

अतुलनीय विश्वासार्हता, दिसण्यात दमदार आणि उत्कृष्ट कामगिरी यांसाठी प्रसिद्ध असलेली लँड क्रूझर ३०० ही टोयोटाच्या जागतिक एसयूव्ही श्रेणीमधील फ्लॅगशिप आहे. या नवीन मॉडेलमध्ये परिवर्तनकारी प्लॅटफॉर्म, प्रगत पॉवरट्रेन, अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये आणि आलिशान इंटेरियर यांचा समावेश आहे, जे लक्झरी, ताकद आणि सर्वच प्रकारच्या रस्त्यांवर वाहन चालविण्याचा आनंद द्विगुणित करतात.

टोयोटा किर्लोस्कर मोटरचे विक्री, सेवा आणि वापरलेले वाहन व्यवसाय विभागाचे उपाध्यक्ष श्री. वरिंदर वाधवा यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, लँड क्रूझर ३०० ही सामर्थ्य, व्यवस्थापन आणि उत्कृष्ट ऑफ-रोड क्षमता यांचे अंतिम प्रतीक आहे. टोयोटाच्या टीएनजीए-एफ प्रणालीवर तयार केलेले हे मॉडेल शक्तिशाली ट्विन-टर्बो व्ही ६ इंजिन, अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये आणि मजबूत तरीही आलिशान डिझाइन प्रदान करते. अति कठीण प्रदेश असो किंवा शहरातील रस्ते पार करायचे असोत, ही एसयूव्ही आराम, उत्कृष्ट कामगिरी आणि उत्कंठा वाढविणारा प्रवास याचा अतुलनीय मिलाफ देते. उत्कृष्टतेची मागणी करणाऱ्यांसाठी ही एसयूव्ही परिपूर्ण साथीदार आहे.

लँड क्रूझर ३०० च्या उल्लेखनीय प्रवासाने आमच्या प्रतिष्ठित ग्राहकांमध्ये एक अनोखे स्थान मिळविले आहे. आम्हाला विश्वास आहे की लँड क्रूझर ३०० ग्राहकांच्या अपेक्षांपेक्षा अधिक सक्षम ठरेल, कारण ही एसयूव्ही तिच्या पूर्वइतिहासाचा, नाविन्याचा सर्वोत्तम मिलाफ साधत आहे. यामुळेच ते प्रिमियम एसयूव्ही श्रेणीमधील हिरो ठरणार आहे.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत बंधक नाट्याच्या गदारोळात पुष्पाचा जीव धोक्यात

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** पुष्पा या एका धडाडीच्या आणि जिद्दी स्त्री च्या प्रेरणादायक कथानकामुळे पुष्पा इम्पॉसिबल मालिका अत्यंत लोकप्रिय झाली आहे. पुष्पा जीवनातील आव्हानांना नेहमी सकारात्मकतेने आणि दृढतेने तोंड देते. अलीकडच्या भागांमध्ये, टी स्टॉलवर व्हॅलेंटाईन डे चा गोंधळ उलगडल्यानंतरचे हलके-फुलके क्षण प्रेक्षकांनी अनुभवले. जेव्हा जुगल (अंशुल त्रिवेदी) सांगतो की तो आणि दिलीप (जयेश मोरे) हे दोघे स्वतंत्रपणे पुष्पाला सिनेमा दाखवायला नेण्याची योजना आखत होते, तेव्हा पुष्पाला हसू आवरत नाही. पण हे हलके-फुलके क्षण फार काळ टिकत नाहीत. दिलीपला एका अधिकाऱ्याचा फोन येतो आणि त्यात सूचित केले जाते की, संतोष (अमित श्रीकांत सिंह) निसटला आहे आणि तो चाळीच्या दिशेने निघाला आहे.

आगामी भागांमध्ये, संतोष दिलीपवर हल्ला करण्यासाठी गुपचुप चाळीत शिरतो पण पोलीसांना लवकरच त्याचा सुगावा लागतो. या गोंधळात तो आपली बंदूक टाकून पळ काढतो. त्यानंतर, नानावटी स्कूलमधल्या एका रियुनियनमध्ये संतोष एक कुटिल योजना आखून परत येतो. तपासणी अधिकाऱ्याचा वेश घेऊन तो स्वरा (वृही कोडवारा) आणि मुन्नी (हंसिका जांगिड) यांच्या उपस्थितीत पुष्पाला बंधक बनवतो. त्यानंतर मोठी चकमक होऊन पुष्पा, दिलीप, जुगल आणि पोलीस मिळून संतोषला रोखण्याचा आणि कायद्याच्या हवाली करण्याचा प्रयत्न करतात.

अखेरीस संतोष पकडला जाईल का? की त्याच्या सूड भावनेतून कथेला आणखी काही वेगळे वळण मिळेल? तणाव खूप वाढला आहे, नाट्य रंगले आहे, त्यामुळे काय होते हे बघत राहा!

पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, येथे लहान मुलांची सुरक्षा या विषयाकडे आम्हाला प्रेक्षकांचे लक्ष वेधून घ्यायचे आहे. ही खूप महत्त्वाची बाब आहे. या भागाचे चित्रीकरण करत असताना मला ९० च्या दशकातील चित्रपट आठवत होते, ज्यामध्ये बंधक बनवून हवे ते मिळवण्याचे प्रसंग बऱ्याचदा बघायला मिळत असत. हे चित्रपट खूप वेधक होते. आमच्या मालिकेतल्या या दृश्यात तीच ऊर्जा निर्माण करताना मजा आली. मला या भागात ज्या पद्धतीने भावनांचे संतुलन साधले आहे, ते फार आवडले. हे दृश्य तुम्हाला हृदयस्पर्शी क्षणांनी मोहित करते आणि मग अचानक एक धक्का देते. या संतुलनामुळेच पुष्पा इम्पॉसिबल मालिका उठून दिसते.

## राशीभविष्य

**मेष :** आज हाती माती घेतली तरी सोन्यात बदलेल. म्हणजेच तुम्ही जे काही काम हाती घ्याल त्यात तुम्हाला यश मिळेल. आणि आर्थिक फायदा होईल. एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला पैसे आणि भेटवस्तू मिळतील.

**वृषभ :** व्यवसायातील समस्या सुटल्याने अडकलेले पैसे वसूल होतील. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील. जमीन, वास्तू, वाहने इत्यादींच्या विक्रीत गुंतलेल्या लोकांना मेहनतीनंतर पैसे मिळतील.

**मिथुन :** आज आरोग्याशी संबंधित विशेष समस्या उद्भवण्याची शक्यता कमी असेल. आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सतर्क आणि काळजी घ्या. आरोग्यासंबंधी किरकोळ समस्या निर्माण होतील.

**कर्क :** व्यवसायात तुमच्या शहाणपणामुळे तोटा नफ्यात बदलेल. राजकारणात लाभदायक पद मिळेल. तुम्हाला कामाच्या ठिकाणी सहकार्य मिळेल. वाहन चालविताना काळजी घेणे आवश्यक आहे.

**सिंह :** आज नको असतानाही प्रवासाला जावे लागेल. महत्त्वाच्या कामात विलंब होण्याची शक्यता आहे. विशिष्ठ व्यक्तीपासून विनाकारण अंतर वाढेल. रोजगाराच्या शोधात इकडून तिकडे भटकावे लागेल.

**कन्या :** घरात पाहुण्यांच्या आगमनामुळे खर्चात वाढ होईल. आज तुम्हाला शत्रू किंवा विरोधी पक्षाच्या चुकीचा किंवा चुकीचा फायदा आर्थिक लाभाच्या रूपाने होईल. जोडीदाराकडून पैसे आणि भेटवस्तू मिळतील.

**तुळ :** तुमचं वर्तन नम्र ठेवा. राग टाळा. उदरनिर्वाहाच्या क्षेत्रात लोकांना नोकरीच्या वाढत्या संघर्षाचा सामना करावा लागू शकतो. नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. शरीरात सर्दी वगैरेच्या तक्रारी असू शकतात.

**वृश्चिक :** आज एखादा मित्र राजकारणात खास सहयोगी सिद्ध होईल. ज्यामुळे तुम्ही खूप भावूक होऊ शकता. प्रेमसंबंधात जोडीदारासोबत प्रेमविवाहाबाबत चर्चा होऊ शकते.


**धनु :** राजकारणात तुम्हाला अडचणी येण्याचे संकेत दिसतात आज पालकांबद्दल थोडी चिंता वाटेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल. ते अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील.

**मकर :** सरकारशी संबंधित लोकांना विशेष यश आणि सन्मान मिळेल. आज एकमेकांशी गोड बोलण्यात आनंददायी वेळ जाईल. कुटुंबात काही शुभ कार्ये पूर्ण होतील.

**कुंभ :** वैवाहिक जीवनात काही राजकीय व्यक्तींमुळे पती-पत्नीमध्ये मतभेद होऊ शकतात. आज तुम्ही धैर्य दाखवू शकता आणि तुमची प्रेमविवाह योजना तुमच्या कुटुंबातील सदस्यांसमोर मांडू शकता.

**मीन :** विवाहासाठी पात्र लोकांना त्यांच्या वैवाहिक जीवनाशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये एकमेकांच्या भावनांचा आदर करा. अन्यथा संबंध बिघडतील.

## शब्दकोडे क्रमांक २०४१



**आडवे शब्द :-**
१) नुकसानीचा व्यवहार
७) त्वरित
११) पाठीला आलेली वक्रता
१२) बरोबर आलेल्या लोकांचा घोळका
१४) दारूचा एक प्रकार
१५) विळखा
१६) भात उकळताना होणारा आवाज
१८) संपणे
२०) थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष
२२) शस्त्र
२४) शिडीच्या पाय-यांची लाकडे
२५) अफवा
२६) दरवळ
२८) पहाटेची गाढ निद्रा
३१) राजाची मुख्य पत्नी
३२) छोटी वस्ती
३३) दुर्दशा
३५) कावळ्याचे ओरडणे
३६) फासळीचे हाड
३८) कोना
४०) गाडीचे छत
४२) तारका
४३) सुटकेचा मार्ग
४५) सुस्ती
४६) कलावंत
४९) लोक
५१) कट्टर
५२) दालचीनीचे झाड
५३) अभिप्राय
५४) राबता, जाणेयेणे
५६) च्या सह
५८) शिव्यांचा भडीमार
६०) टरफल
६१) ** ** दंड भेद
६३) सावली
६४) ज्वर
६५) सप्तस्वरातील पहिला स्वर
६६) हत्याराची पिशवी
६७) मणका
६८) दारावरील खुणेचा आवाज
७०) स्तब्धता, शांतता
७२) नारायणाचा सतत जप करणारा मुनी
७३) मावळतीची दिशा
७४) श्रीमंत

**उभे शब्द :-**
२) तपस्याची राहण्याची जागा
३) बगळा
४) चहाटळ
५) बदल
६) रंगविलेले हळकुंड
७) फिकीर
८) लक्ष्मीचे एक नाव
९) भय
१०) कमळाची बी
१३) दिवाळे काढलेल्या माणसाकडूनपरत मिळालेली अतिशय अल्प रक्कम (वा प्र)
१५) जेमतेम
१६) सूर्याचे एक नाव
१७) मलईची घट्ट बासुंदी
१९) उंच-सखल नसलेले
२१) पायजमा
२३) सुंदर तरुणी
२५) थरथर कापणे
२७) माणूसकी
२९) वार्ता
३०) पर्णकुटी
३१) बुद्धी
३२) छोटे वादळ
३४) सिंह
३६) भरभराट
३७) ठिबकणारा, गळणारा
३८) राग
३९) पोपट
४१) उथळ आकार
४४) एकाग्र नजर
४५) निवासस्थान
४७) लाजा आणणारा
४८) रमल विद्या जाणणारा
५०) आश्चर्य
५५) घोडागाडी
५७) कारस्थानी
५९) नुकसान, दागिन्यातील झीज
६०) भेग, चीर
६२) अगदी मध्यभागी
६३) बैलाच्या गळ्याचे पोळे
६४) शक्ती
६८) चेष्टा
६९) बशीचा जोडीदार
७०) थोडक्यात सामोपचार
७१) मासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर





# मेळघाटातील दळणवळणाच्या सोयी दिवास्वप्नासारख्या

**रस्त्यांची दयनीय अवस्था ■ व्याघ्र प्रकल्पाच्या जटील नियमांमुळे विकासाला ब्रेक**

**मारोती पाटणकर**
**चुरणी( दि.22 )** – मेळघाटातील दुर्गम भागातील गावांना जोडणारे रस्ते अजूनही बेवारस आहेत. हे रस्ते अजूनही पक्के झालेले नाहीत. या भागातील आदिवासी बांधवांना अजूनही या कच्च्या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. देशाला स्वातंर्त्य मिळवून 78 वर्षे झाले आहेत, परंतू मेळघाटातील दळणवळणाच्या सोयी येथील नागरिकांकरिता दिवास्वप्नासारख्या आहेत. या भागातील आदिवासी बांधवांना अजूनही चांगले रस्ते मिळालेले नाहीत. या भागातील आदिवासी बांधवांचा प्रवास अजूनही खडतर आहे. कोसो दूर रस्त्यांवरून आदिवासी बांधवांना पादळ प्रवास करावा लागतो. अजूनही या भागात एसटी महामंडळाच्या बस सुद्धा जात नाहीत किंवा खाजगी वाहने सुद्धा पोहोचत नाहीत ही शोकांतिका आहे. कारण रस्तेच नाहीत. सेमाडोह ते हतरू रायपुर हा रस्ता शेकडो वर्षापासून बेवारस आहे. या रस्त्यांवर मेळघाटातील 40 ते 50 गावे जोडलेली आहेत. दुर्गम भागातील खेडेपाडे या भागातील नागरिकांना या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो, मात्र या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या भागातील आदिवासी





बांधव तारेवरची कसरत करून या प्रवास करतात. शेकडो वर्षे या भागातील आदिवासी बांधव अनेक वर्ष याच रस्त्यावरून प्रवास करतात. या भागातील नागरिकांचे जीवनमान अतिशय खडतर आहे. या भागातील एखादा नागरिक आजारी पडला तर, आजारी व्यक्तीला दवाखान्यात नेण्यासाठी सुद्धा वाहन मिळत नाही. अशा वेळी उपचाराअभावी त्याला आपला जीव गमवावा लागतो. इतकी भयानक परिस्थिती आजही मेळघाटात आहे. अनेक गरोदर मातांना अशावेळी जीव गमवावा लागला आहे. सेमाडोह ते रायपूर, हतरु, चुनखडी, खडीमल, माळीझडप, बिच्छूखेडा, नवलगाव अशा अनेक भागातील जाणारे रस्ते अतिशय खराब आहे. किनीखेडा, खामदा, रंगूबेली या भागातील रस्ते तर जवळजवळ नष्टच झाले आहे. राज्य सरकार व केंद्र सरकार व वन विभाग यांचा समन्वय असल्यास हे रस्ते दुरुस्त होऊ शकतात. व्याघ्र प्रकल्पाच्या जटील नियमांमुळे येथील विकासाला ब्रेक लागला आहे. मात्र प्रशासन व शासनाच्या उदासीन धोरणामुळे मेळघाटातील विकासापासून कोसो दूर जात आहे. या भागातील नागरिकांना सुद्धा चांगले रस्ते मिळावेत अशी मागणी होत आहे.

### शिक्षण, आरोग्यावर विपरित परिणाम!

मेळघाटातील रस्ते दुर्गम भागात जाणारे रस्ते स्वतंत्र काळापासून अतिशय खराब आहेत. त्या रस्त्यांमुळे मेळघाटातील नागरिकांच्या शिक्षण, आरोग्य व आर्थिक विकास या सगळ्या गोष्टींवर परिणाम होत आहे. या भागातील नागरिकांचे जीवनमान खालावत आहे. या भागातील रस्ते चांगले झाले. या भागाची प्रगती होईल.

**सहदेव बेलकर,**
**अध्यक्ष तालुका काँग्रेस कमिटी, चिखलदरा.**



## शेतातील 50 हजारांचा चणा चोरला

**अमरावती** – येवदा ठाण्याच्या हद्दीतील भामोद शिवारातील एका शेतातून 50 हजार रुपये किमतीचा चणा चोरुन नेण्यात आला. ही घटना 19 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. जैनपूर येथील रहिवासी शरद कोरपे (72) यांचे भामोद शिवारात शेत आहे. या शेतातील कापून ठेवलेला 50 हजार रुपयांचा चणा अज्ञात चोरट्याने चोरुन नेला. ही बाब लक्षात आल्यावर शरद कोरपे यांनी येवदा ठाण्यात तक्रार दाखल केली. या घटनेचा पुढिल तपास येवदा पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहे.

# गावातील सांडपाण्याची नाली जलवाहिनीवरुन

## वडगाव फत्तेपुर येथील प्रकार

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपुर,( दि.22 )** – परतवाडा ते अकोला राज्य महामार्ग क्रमांक 548 सी या रोडच्या बाजुला वडगाव फत्तेपुर येथे सुरू असलेल्या नाली बांधकामामुळे भविष्यात मोठा जलप्रदूषणाचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. महामार्गाच्या बाजूला मोठी मोकळी जागा असतानाही जीवन प्राधिकरणाने पाणीपुरवठ्यासाठी टाकलेल्या मुख्य जलवाहिनी वरूनच सांडपाण्याची नाली बांधण्याचे काम सुरू आहे. भविष्यात पाणी पाणी दूषित होण्याचा गंभीर धोका व जलवाहिनी दुरुस्तीसाठी नाली फोडल्या शिवाय पर्याय राहणार नाही, त्यामुळे शासन निधीचा अपव्यय होण्यासोबत अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. असे असतांनाही प्रशासनाकडून या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

मुख्य पाणीपुरवठा जलवाहिनी द्वारे पुढील अंजनगाव कडील गावांना पाणीपुरवठा केला जाणार आहे. परंतु जर भविष्यात जलवाहिनीमध्ये गळती झाली किंवा काही समस्या उद्भवली, तर दूषित सांडपाणी थेट पिण्याच्या पाण्यात मिसळण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोपस्थानीय नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या चुकीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित अधिकारी ऐकण्यास

तयार नाहीत, असा आरोप केला जात आहे. आता हे बांधकाम पूर्ण होण्याआधीच योग्य तो बदल केला जाऊ शकतो, मात्र प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने भविष्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. तत्काळ उपाययोजना करण्याची मागणीनागरिकांनी प्रशासनाला सांडपाण्याची नाली आणि पाणीपुरवठा जलवाहिनी वेगळ्या जागी नेण्याची मागणी केली आहे. भविष्यात होणारे जलप्रदूषण आणि संभाव्य आरोग्यधोका टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना करावी, अशी मागणी श्रीकृष्ण सगणे, शालिनी सगणे, राजेंद्र अतकरे, धनंजय पोफळी, संदीप दौड, सचिन सगने, योगेश राव, मनिष अतकरे, धनराज ढोले, सुनिल गाडगे, राज मेटकर, निलेश वानखडे, रमेश कानेरकरसह आदि नागरीकांनी केली आहे.

## प्रकाश काळबाडे यांना पितृशोक

**अमरावती** – अमरावती तालुक्यातील कठोरा बुद्रुक येथील रहिवासी असलेले अमरावती जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष प्रकाश काळबांडे यांचे वडील बाबाराव पाटील काळबांडे यांचे वृद्धपकाळाने निधन



झाले ,मृत्यू समयी ते 92 वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात प्रकाश काळबांडे, प्रमोद काळबांडे, संजय काळबांडे ,सुनिता काळे ,सीमा अढाऊ असा परिवार आहे. त्यांचा अंतिम संस्कार कठोरा बु. येथे सकाळी 10 वाजता रविवारी होईल.

# नवीन प्रशासकिय इमारतीला गाडगेबाबांचे नाव द्या!

■ **बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानची मागणी**
■ **सोमवारपासून बेमुदत उपोषणाचा इशारा**

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.22 )** – अंजनगाव सुर्जी येथे पंचायत समिती कार्यालयाची नवीन इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीला वैराग्यमूर्ती संत श्री गाडगेबाबा प्रशासकीय इमारत असे नाव देण्यात यावे, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक प्रतिष्ठानचे तेजस अभ्यंकर व सुनील राक्षसकर यांनी केली आहे. त्यासाठी सोमवार, 24 फेब्रुवारीपासून त्यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु करण्याचा इशारा गट विकास अधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनातून दिला आहे. या प्रमुख मागणीसोबतच सर्वसामान्य जनतेशी संबंधित अन्य मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

गाडगे बाबांचे जन्मस्थळ असलेले शेंडगाव खासपूर हे गाव अंजनगाव सुर्जी तालुक्यात येते. हा तालुका गाडगेबाबांची कर्मभूमिसुद्धा आहे. त्यामुळे पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीला गाडगेबाबा यांचे नाव दिल्याने पंचायत समितीचाच गौरव वाढणार असल्याचे अभ्यंकर व राक्षसकर यांनी म्हटले आहे. या प्रमुख मागणीसह अन्य मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या आहेत. पंतप्रधान आवास योजनेप्रमाणे रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुल बांधण्याकरिता त्यांच्या आवश्यक त्या नातेवाईकांची संमती पत्र 500 रुपयाच्या स्टॅम्पवर घेऊन जागा उपलब्ध करून द्यावी व अशा घरकुलांना नमुना 8 वर नोंद घेण्यात यावी, तसेच पंतप्रधान व रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचे अनुदान साडेतीन लाखापर्यंत करण्याकरिता प्रशासनाला आपल्या स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा अशा मागण्या करण्यात आल्या असून त्यासाठी सोमवारपासून उपोषण करण्यात येणार आहे. निवेदन देतेवेळी तेजस अभ्यंकर, सुनील राक्षसकर, बाळासाहेब आठवले, मनोज मुळे, साहेबराव सदाशिव उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीला पळविले

**अमरावती** – एका अल्पवयीन मुलीला पळविण्यात आल्याची घटना मोर्शी ठाण्याच्या हद्दीत 19 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. मोर्शीठाण्याच्या हद्दीतील रहिवासी एका मुलीला रवींद्र भांगे (40) रा. जलालखेड, नागपूर याने गिफ्ट देण्याचे आमिष दाखवून पळवून नेले. ही बाब मुलीच्या कुटुंबीयांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मोर्शी ठाण्यात तक्रार दाखल केली.

# चुरणी येथे युवा स्वाभिमान पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.22 )** – चिखलदरा तालुक्यातील चुरणी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पर्वावर युवा स्वाभिमान पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हा अध्यक्ष अजय देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष उपेन बछले, जिल्हा कामगार युनियन अध्यक्ष व धारणी तालुका अध्यक्ष दुर्योधन जवारकर, जिल्हा उपाध्यक्ष राजेश वर्मा, विठ्ठल ढोले, तमीजजी शहा, आनंद गौर आणि बादल कांचन आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादनही करण्यात आले. कार्यक्रमाला पक्षाचे स्थानिक पदाधिकारी नागेश मुंडे, सोनू मालवीय, सुनील बिलवे, किशोर बेठेकर, रंजनाताई येवले, सतीश हरसुले, रामदास बछले, मुकेश आठवले, शिवा जयस्वाल, आशिष टाले, आयुष मालवीय, विनोद हरसुले, राजा धिकार, हरिओम बेलकर, रामकिशन कास्देकर, राहुल गाठे, राहुल आठवले, सागर मोरले, शिवम सतवासे, शुभम आठवले आणि निलेश उईके प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमात युवास्वाभिमान पक्षाच्या विचारधारेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पक्षाच्या आगामी योजनांवर चर्चा झाली.



# खंडेलवाल ज्वेलर्स तर्फे ज्वेलरी प्रदर्शनाला सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.22 )** – अकोलाच्या प्रसिद्ध खंडेलवाल ज्वेलर्स प्रा. लिमिटेड तर्फे वरुड येथील केदार चौकात असलेल्या शोरूम मध्ये 20 ते 23 फेब्रुवारी या कालावधीत सोने, डायमंड, प्लॅटिनम ज्वेलरीच्या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन ज्योती दीपक खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आले. विविध क्षेत्रातील महिलांकडून या प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ज्वेलरी साहित्य पाहण्यासाठी व खरेदीसाठी ग्राहकांची शोरूम मध्ये झुंबड उडत आहे. प्रदर्शनीचा लाभ घेण्याचे आवाहन खंडेलवाल ज्वेलर्सचे संचालक हर्षल खंडेलवाल यांनी केली आहे. गजानन महाराज प्रगटदिन महोत्सवाचे औचित्य साधून तसेच लग्नप्रसंग व सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर केदार चौकातील खंडेलवाल ज्वेलर्समध्ये ही प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. प्रदर्शनीनिमित्त ग्राहकांना सोन्याच्या ज्वेलरीवर 25 टक्के तर डायमंडच्या ज्वेलरीवर 50 टक्के मेकिंग चार्जेस मध्ये सूट देण्यात येत आहे. त्यासोबतच अनेक आकर्षक योजना सुद्धा खंडेलवाल ज्वेलर्स ने ग्राहकांसाठी जाहीर केल्या आहेत. उद्घाटन समारंभाला एकता कानुगो, अर्चना सोनारे, प्रेमा अग्रवाल, पूजा अग्रवाल, अर्चना सोलव, ज्योती अग्रवाल, विनिता राजोरिया, माधुरी भोंडे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वांनी प्रदर्शनीत ठेवण्यात आलेल्या ज्वेलरी साहित्याची प्रशंसा केली. प्रदर्शनीला पत्रकार दीपक खंडेलवाल, व्यापारी संघाचे अध्यक्ष लोकेश अग्रवाल, माजी नगरसेवक संजय कानूगो, सातपुडा जिनिंग प्रेसिंगचे उपाध्यक्ष शंतनु सोलव, नरेंद्र सोनारे आदी मान्यवरांनी भेटी दिल्या.

**केदार चौकातील शोरूम मध्ये आयोजन**

# सैन्यदलातील हरिराम सालोंढेवर शासकिय इतमामात अंत्यसंस्कार

■ **काजळीसह पंचक्रोशीतील नागरिकांची उपस्थिती** ■









**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार( दि.22 )** – भारतीय सैन्यदलात सेवा देणार्यास चांदुर बाजार तालुक्यातील काजळीच्या हरिराम सोमजी सालोंढे यांचे सुटीवर गावी आलेले असताना पोटाच्या विकाराने निधन झाले. त्यांच्यावर काजळी येथील स्मशानभूमित शोकाकुल वातावरणात शासकिय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील शेकडो नागरिकांनी उपस्थित राहुन हरिराम यांना साश्रु नयनांनी अखेरचा निरोप दिला.

पुलगाव येथील सैन्यदलाच्या चमुने यावेळी हरिराम सालोंढे यांना सलामी दिली. चांदुर बाजारचे तहसिलदार, शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याचे ठाणेदार तसेच माजी सैनिक फेडरेशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. चांदूरबाजार हरिराम सालोंढे हा भारतीय सैन्यदलात वयाच्या 19 व्या वर्षी दाखल झाला होता. काजळी या 1100 लोकसंख्या असलेल्या गावातून पहिला भारतीय सैनिक म्हणून त्याची ओळख होती. घरची परिस्थिती अत्यंत बिकट, मिळेल ते काम करून हरी हा भारतीय सैन्य दलात दाखल झाला होता. त्यानंतर गावातील अनेक होतकरु मुलांना त्यानें प्रेरणा दिली आणि आज गावात अनेक मुले सैन्य दलात सामील झाली आहेत.

हरिराम सालोंढे उत्तराखंड येथील दारजीव येथिल युनिटचा सैनीक होता. तो सुटीवर गावी आला होता. जानेवारी महिन्यात सुट्टी संपण्याच्या काही दिवस आधी पोटात दुखत असल्याने त्याने परतवाडा येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेतले. मात्र त्रास कमी झाला नाही. तेव्हा त्याला नागपूर येथील एम्समध्ये दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना 20 फेब्रुवारी रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. शुक्रवारी त्यांच्या गावी काजळी येथे त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमात अंतिम संस्कार करण्यात आले.

### घरची परिस्थिती हलाकीची

हरिराम सैन्यदलात भरती झाल्यानंतर काही दिवसांतच त्याच्या मोठ्या भावाचा अपघाती मृत्यु झाला होता. त्यामुळे घरची जबाबदारी हरिरामसरच होती. आता हरिरामच्या मृत्युमुळे त्याच्या कुटुंबावर दुखाचा डोंगर पसरला आहे. त्याच्या पश्चात आई, वडिल व तीन विवाहित बहिणी असा परिवार आहे. हरिराम अविवाहित होता.

# करजगाव येथे नेत्र तपासणी, आरोग्य व रक्तदान शिबिर

**शिवजयंती निमित्त आक्रोश संघटनेतर्फे आयोजन**

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.22 )**– तालुक्यातील करजगाव येथील आक्रोश जनशक्ती संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून बुधवारी आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन बेनोडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार ज्ञानोबा फड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देविदास बहुरूपी हे होते. यावेळी माजी सैनिक अरविंद गजभिये, संघटनेचे अध्यक्ष सुशील बेले प्रामुख्याने उपस्थित होते. रक्तदान शिबिरात 21 रक्तदात्यांनी रक्तदान केले.

डॉ. अरुण घरडे यांनी 102 नेत्र रुग्णांची तपासणी केली. गावातील असंख्य स्त्री–पुरुषांची आरोग्य तपासणी याप्रसंगी करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन




चरित्राविषयी माहिती दिली.

शिबिरासाठी डॉ. निखिल पवार, डॉ. संदीप बहरे, डॉ. सुमित घोडे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून शिवरायांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रक्षिक शियाले यांनी तर आभार प्रदर्शन महिला आघाडीच्या तालुका सचिव सुनंदा बिसांद्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्षा ढोले, संगीता बिसांद्रे, संगीता इंगळे, अविनाश बिसांद्रे, महेश घोरपडे, सागर नेवारे, प्रणव बिसांद्रे, बंटी बिसांद्रे यांचे सहकार्य लाभले.

# भक्तिमार्ग

## महिमा शिव उपासनेचा

**भगवान शंकरांनी हजारो भक्तांना, ऋषी-मुनींना तसेच देवांप्रमाणे दानवांनादेखील वर दिले. त्यांना जीवनाची प्रणाली, तत्त्वं शिकवली. अशा भोळ्या शंकराची आराधना करण्याचा उत्सवदिवस म्हणून आपण महाशिवरात्र साजरी करतो. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीला शिवरात्र म्हणतात. परंतु माघ महिन्यातील शिवरात्र विशेष महत्त्वाची मानली जाते. व्रतवैकल्य, उपवास आणि शिवआराधनेद्वारे श्रद्धापूर्वक हा दिवस साजरा होतो.**



प्रासंगिक

आपल्या संस्कृतीत विविध सणवारांचं नेमकं महत्त्व आहे. विशिष्ट ऋतूमानानुसार येणाऱ्या सणवारांच्या निमित्तानं निसर्गाचं पूजन केलं जातं. या भारतभूमीत विविध देवी-देवतांचं वास्तव्य राहिलं आहे. त्यांच्या वास्तव्यानं विविध ठिकाणं पावनं झाली आहेत. अशा पवित्र ठिकाणी त्या त्या दैवतांच्या मंदिरांची उभारणी करण्यात आली. आजही अशा ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची मोठ्या संख्येनं गर्दी होत असते. आपल्याकडे वर्षभर सणवारांची रेलचेल असते. माघ महिन्यात गणेश जयंतीचा सोहळा मोठ्या भक्तीभावानं साजरा केला जातो. या निमित्तानं विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. यानंतर वेध लागतात ते महाशिवरात्रीचे. महाशिवरात्री म्हणजे भगवान शंकराच्या भक्तांसाठी मोठी पर्वणीच असते. 'हर हर महादेव', 'शंभो शिवशंकर'च्या गजरात महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी लाखो भक्तांच्या रांगा लागतात.

शंकर हे अनेकांचं श्रद्धास्थान आहे. खरं तर श्रद्धेशिवाय जगण्याला काहीच अर्थ नाही. आई-वडिलांवर, गुरुजनांवर, देशावर, कामावर आणि धर्मावर श्रद्धा हवी. इथेच आपली पाळमुळं रुजलेली असतात. सण-उत्सव हादेखील त्यातीलच एक भाग आहे. सन-उत्सवांच्या साजरीकरणातून आपल्या अमूल्य अशा संस्कृतीचं जतन केलं पाहिजे. भारतीय संस्कृतीतील सौंदर्य आणि तत्वज्ञानाला तोड नाही. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितलं पण या मार्गाने सर्वांनाच कर्तव्यप्रवृत्त केलं. त्याचप्रमाणे भगवान शंकरांनी हजारो भक्तांना, ऋषी-मुनींना आणि देवाप्रमाणे दानवांनासुद्धा प्रसन्न होऊन 'वर' दिले. जीवनाची प्रणाली, तत्त्वे त्यांना शिकवली. अशा भोळ्या शंकराची आराधना करण्याचा उत्सवदिवस म्हणून आपण महाशिवरात्रीकडे पाहतो. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीस शिवरात्र म्हणतात; परंतु माघ महिन्यातील शिवरात्र विशेष महत्त्वाची मानली जाते.

या दिवशी शिवलिंगास अभिषेक करुन १०८ किंवा सहस्त्र बिल्वपत्रे वाहून उपवास करतात. शिवमंदिरात रात्रभर जप-स्त्रोत्रे म्हटली जातात. या दिवशी शिवाची प्रदोष पूजा करतात. सोमवार हा शिवाचा वार असल्यामुळे सुवासिनी १६ सोमवारचं व्रत करतात. प्रदोषकाळी भक्तगण भस्म आणि रुद्राक्ष धारण करून शिवाच्या मंदिरात जातात. यावेळी शिवाचं ध्यान केलं जातं. त्यानंतर भगवान श्री शंकराची षोडशोपचार पूजा होते. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाला १०८ कमळं किंवा बेलाची पानं अर्पण करण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे पुष्पांजली अर्पण करुन अर्घ्य दिलं जातं. पूजा, स्त्रोत्रपाठ आणि मूलमंत्राचा जप याही बाबी महत्त्वाच्या ठरतात. ही पूजा श्रद्धापूर्वक व्हायला हवी. मनोभावे पूजा केल्यावर हातून कळत-नकळत घडलेल्या दुष्कृत्यांबद्दल क्षमायाचना करावी. या काळात चार प्रहरी चार पूजा कराव्या, असं सांगण्यात आलं आहे. त्यांना 'ग्रामपूजा' म्हणतात. प्रत्येक ग्रामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालावं. अनुलेपन करावं. धोत्रा, आंबा आणि बेल यांची पत्री वहावी. तांदळाच्या पिठाचे २६ दिवे करुन त्यांनी देवाला ओवाळावं. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान करावे. प्रत्येक पूजेतील मंत्र वेगवेगळे असतात. त्यांनी अर्घ्य द्यावं. महाशिवरात्रीच्या रात्री नृत्य, गीत, कथाश्रवण आदींमध्ये भक्तीभावनेने लीन व्हावं असं महाशिवरात्रीच्या व्रताचं महात्म्य सांगितलं जातं.

'नम: शिवाय' हा शिवाचा पंचाक्षरी मंत्र आहे. त्यातील प्रत्येक अक्षराचा अर्थ जाणून घ्यायला हवा.

**न** = समस्त लोकांचा आदीदेव.

**म:** = परमज्ञान देणारा आणि महापातकांचा नाश करणारा.

**शि** = कल्याणकारी, शांत आणि शिवानुग्रहाला कारणीभूत असणारा.

**वा** = वृषभवाहन, वासुकि, वामांगी, शक्ती यांचा सूचक.

**य** = परमानंदरुप आणि शिवाचे शुभ असे वास्तव्यस्थान.

अशा या शिवाला नमस्कार असो अशी या जपामागची भावना आहे.

आपल्याकडे देवपूजेतील प्रत्येक कृतीला अर्थ आहे. पुजेच्या वेळी केला जाणारा प्राणायाम हा फुफ्फुसांची ताकद वाढवतो. रोगाला दूर ठेवतो तर 'ॐ नम: शिवाय' सारख्या जपामुळे दीर्घश्वसन घडतं. तीर्थरूपात मिळणारं पंचामृत प्राशन केल्यामुळे त्यातील दूध, मधासारख्या शरीराला उपकारक ठरणाऱ्या घटकांचा लाभ मिळतो. पूजा-अर्चनेमुळे मन एकाग्र होतं. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात या मानसिक शांततेची खरी आवश्यकता आहे. आरोग्याच्या दृष्टीनेही मन:शांती आवश्यक असते. आपल्याकडे मोठ्यांना नमस्कार करण्याची पद्धत आहे. 'नमस्कारे लीनता घडे, नमस्कारे विकल्प मोडे' अशा तऱ्हेने त्यातून नम्रता तर दिसतेच पण शरीरालाही एक प्रकारचा व्यायाम होतो. वाकल्यामुळे, मेंदूकडे जास्त रक्तपुरवठा होतो. आरोग्याच्या दृष्टीने हे फायदेशीर असतं. आपण दारात तुळस लावतो, तुळस ही अतिशय औषधी वनस्पती आहे. त्यामुळे सर्दी, खोकला झाल्यास त्यावर बहुगुणी असा तुळशीच्या पाल्याचा काढा तयार करता येतो. त्याचप्रमाणे तुळस दारात असल्यास डास, माशाही कमी होतात. शंकराच्या मंदिरात आपण बेल वाहतो. त्यामागेही शास्त्रीय कारण आहे. या सर्वच वनस्पती औषधी आहेत. मानवी आरोग्याच्या दृष्टीने त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते लक्षात घ्यायला हवं.

भारतामध्ये बारा ज्योतीर्लिंगे आहेत. महाराष्ट्रात त्याचं महत्त्व वेगळंच आहे. देशामधील सोरटी-सोमनाथ, मल्लिकार्जून, महाकालेश्वर, ओंकार-अमलेश्वर, वैद्यनाथ, भीमाशंकर, रामेश्वर, नागेश्वर, काशीविश्वेश्वर, त्र्यंबकेश्वर, केदारेश्वर, घृणेश्वर या सर्व मंदिरात महाशिवरात्रीच्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी खूपच गर्दी असते. या स्थानांना वेगळं असं पौराणिक महत्त्व आहे. या सर्व स्थळांना भाविक अत्यंत श्रद्धेने भेटी देतात. मन:शांती हा त्यातील अत्यंत महत्वाचा भाग. या सर्व सण-उत्सवांची बैठक वैज्ञानिक दृष्टीकोन लक्षात ठेवून केल्यामुळे त्याचे अप्रत्यक्ष फायदेही खूप होतात. प्रत्येक सण-उत्सवातील पदार्थ हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो. उपवास हा यामधील श्रद्धेचा भाग मानला जातो. यात आहारशास्त्राचा विचार केला असल्यामुळे आपलं आरोग्य चांगलं राहतं.

कोणत्याही गोष्टीचा संबंध धर्माशी जोडल्यावर त्यातील चांगल्या गोष्टी आत्मसात करणं सोपं जातं, हे ओळखून आपल्या पूर्वजांनी समाजहितकारक अशा अनेक गोष्टींचा धर्माशी समन्वय साधला. उदा. वृक्षपूजा, प्राण्यांना देव मानून पूजा करणं यामुळे आपोआपच निसर्गाचा समतोल राखला जाई. झाडे तोडणं, प्राण्यांना मारणं आदी कृत्ये रोखण्यासाठी पूर्वी कायदे करावे लागले नाहीत. निसर्गपूजेतून समाजाचा डोळस दृष्टीकोनच समोर आला आहे. पूर्वीच्या काळी निसर्गाच्या समतोलाविषयी पुरेशी काळजी घेतली जात असे. सध्या मात्र ही जाणीवच नाहिशी झालेली आहे. त्यामुळे नव्याने निसर्गाशी जवळीक साधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यासाठी व्रतवैकल्याचा आधार मोलाचा आहे.

महाशिवरात्रीसारख्या अनेकविध सण उत्सवानिमित्त यात्रेच्या रुपाने अनेक लोक एकत्र येतात. त्यातून नवीन ओळखी होतात. दुर्मीळ होत असणारा सुसंवाद प्रस्थापित होण्यास ही एक चांगली संधी असते. यातूनच एकमेकांचं सुख-दु:ख कळतं, प्रेम वाढतं, सहकार्य वाढतं आणि त्याचा समाजाला फायदा होतो. सण-उत्सवानिमित्त आपण घर तर स्वच्छ करतोच पण त्यातून परिसरही स्वच्छ होतो. दाराला लावलेलं तोरण, अंगणातील सुबक रांगोळी असं मंगलमय वातावरण निर्माण झाल्याने हे सण-उत्सव आपल्याला अपार आनंद देऊन जातात. समाजात एकोपा, बंधुभाव वाढीला लागणाच्या दृष्टीने उत्सवांचं महत्त्व मोठं आहे. समाजाच्या विविध घटकातील कटुता नाहीशी होऊन जगाला शांततेचा आणि एकतेचा संदेश देण्यासाठी पुरेसं बळ मिळावं हीच प्रार्थना या महाशिवरात्रीच्या निमित्तानं भगवान शंकराकडं करू या.

## कसा मिटवायचा वाद?

सेल्फ हेल्प

हिंदू धर्मातील धर्मग्रंथांमधून आयुष्याला एक मार्ग मिळतो. आयुष्यातल्या अनेक प्रसंगांवर मात करण्याची शक्ती मिळते. हिंदू धर्मातल्या पौराणिक कथा वेगवेगळ्या युगांमध्ये घडल्या असल्या तरी आजच्या अनेक प्रसंगांमध्येही या कथांचं सार लागू पडतं. वादविवाद टाळून मार्ग कसा काढायचा हे या कथांमधून आपल्याला शिकायला मिळतं. वादविवादांवर कसा मार्ग काढायचा हे आपण रामायणातून शिकू शकतो. राजा दशरथाच्या तीन राण्या होत्या.



कौशल्या, सुमित्रा आणि कैकयी. या राण्यांचे चार पुत्र. राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न. श्रीराम सर्वात मोठा. म्हणून अयोध्येचं राज्य रामाला देण्याचा निर्णय दशरथाने घेतला. अयोध्येचा भावी राजा म्हणून तो रामाकडे पाहत होता. पण कैकेयीला हे मंजूर नव्हतं. आपला मुलगा भरत याला अयोध्येचं राज्य मिळावं, अशी इच्छा तिच्या मनात जागी झाली. कैकेयीची दासी मंथरेने तिचे कान भरले आणि रामावर जीवापाड प्रेम करणाऱ्या कैकेयीने त्याला वनवासात पाठवलं. आज्ञाधारक रामाने आपल्या पित्याची आज्ञा मान्य करून वनवासाचा रस्ता धरला. लक्ष्मण आणि सीतेनेही त्याला सोबत करायचं ठरवलं.

रामाच्या चौदा वर्षांच्या वनवासकाळात भरताने त्याच्या पादुकांची मनोभावे पूजा केली. अयोध्येच्या राजसिंहासनावर रामाचा अधिकार आहे हे तो जाणून होता. म्हणूनच सिंहासनावर रामाच्या पादुका ठेऊन १४ वर्षं कार्यभार सांभाळला. चौदा वर्षांनंतर राम अयोध्येला परत आल्यानंतर भरत या जबाबदारीतून मुक्त होतो आणि रामाला राजसिंहासन सोपवतो. अर्थात या काळात सगळे वाद संपुष्टात आलेले असतात. सगळं काही छान होतं. पृथ्वीवर रामराज्य अवतरतं. वादविवादांवर बुद्धीच्या जोरावर योग्य मार्ग काढण्याचं भरताने ठरवलं. त्याला मार्ग मिळाला. भरताने चातुर्य दाखवलं आणि भावंडांमध्ये कोणतंही वितुष्ट येऊ दिलं नाही. धैर्य आणि बुद्धी यांचा वापर करून माणूस प्रत्येक परिस्थितीचा सामना करू शकतो. प्रत्येक परिस्थितीतून मार्ग काढू शकतो. रामायणातून आपण हा धडा घेऊ शकतो.

## खडकातून साकारले मंदिर

तीर्थक्षेत्र

स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असलेली अनेक मंदिरं भारतात आहेत. खजुराहोची मंदिरं वास्तूकलेला उत्तम नमुना म्हटली पाहिजे. देशातल्या प्रत्येक राज्यात वैशिष्ट्यपूर्ण मंदिरं आहेत. राजस्थानातील राजसमंद आणि पाली जिल्ह्याच्या सीमेवर एक मंदिर वसलंय. भगवान परशुरामाने या मंदिराची निर्मिती केल्याचं बोललं जातं. परशुच्या सहाय्याने खडक कापून परशुरामाने हे मंदिर उभारलंय. 'टांगीनाथ धाम' या नावाने हे मंदिर ओळखलं जातं. पाली जिल्ह्यापासून १०० मीटर अंतरावर हे मंदिर वसलंय. कुंभलगडपासून हे मंदिर अवघ्या १० किलोमीटर अंतरावर आहे. या मंदिरात परशुरामाच्या परशुचं दर्शनही घेता येतं. म्हणूनच या मंदिरात भाविकांची बरीच गर्दी झाल्याचं पहायला मिळतं.



भगवान परशुरामाला विष्णूचा अवतार मानलं जातं. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केली होती. हे मंदिर एका गुहेत आहे. या मंदिरापर्यंत जाण्यासाठी ५०० पायऱ्या चढाव्या लागतात. परशुरामाने त्रेतायुगात कठोर तपश्चर्या केली होती. शिवलिंग समोर ठेऊन तपश्चर्या केली होती. हे शिवलिंग या मंदिरात पहायला मिळतं. राजस्थानात या मंदिराचं मोठं महत्त्व आहे. परशुरामाने स्थापन केलेल्या शिवलिंगाचं दर्शन घ्यायचं असेल तर या मंदिराला भेट द्यायला हवी. पण यासाठी राजस्थानातल्या पालीमध्ये जायला हवं. परशुरामाच्या अस्तित्त्वाने पावन झालेलं हे स्थान बरंच प्रसिद्ध आहे. याठिकाणी गेल्यावर परशुरामाच्या अस्तित्त्वाची जाणीव होत राहते. असं हे अनोखं मंदिर शिवभक्तांसाठी पर्वणीच आहे.

## कायम रहा उत्साही

बोध

आपल्यापैकी प्रत्येकाने उत्साही आणि उल्हासित आयुष्य जगायला हवं. उत्साह आणि उल्हास हे आनंदी जीवनाचं गमक आहे. जीवनात आनंदी आणि उत्साही राहायचं तर आयुष्याचं एक उद्दीष्ट असलं पाहिजे. उद्दीष्टहीन मनुष्याचं आयुष्य पशुसमान मानलं जातं. मनुष्यजन्म मिळायला भाग्य लागतं. ८४ लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्य जन्माचा लाभ होतो. म्हणूनच माणूस म्हणून जन्म घेतल्यानंतर आपण चांगली कर्म केली पाहिजेत. आयुष्याचं एक ध्येय निश्चित केलं पाहिजे. ध्येय निश्चित करून ते पूर्ण करण्यासाठी आपण झटलं पाहिजे. या ध्येयपूर्तीत प्रचंड आनंद असतो. संघर्ष असला तरी त्यातही एक मजा असते. या जगात अनेक आंदोलनं झाली. ही सगळी आंदोलनं ध्येय आणि उत्साहामुळे यशस्वी ठरली. मानवी हक्कांसाठीच्या या आंदोलनांमुळे आयुष्याला नवी दिशा मिळाली.



आता माझं वय झालं, या वयात मी काय करू. आयुष्य संपायची वेळ आली असं अनेक जण म्हणतात. पण उत्साह आणि उल्हास यांचा संबंध वयाशी लावता येत नाही. काही ज्येष्ठ नागरिक अशक्य असलेल्या गोष्टी करून दाखवतात. कुणी धावतो तर कुणी एव्हरेस्ट सर करून दाखवतो. आयुष्यात असलेल्या उत्साहामुळेच हे शक्य होतं. सेवानिवृत्ती पत्करल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात कोणतंही उद्दीष्ट राहात नाही. त्यामुळे असे लोक पलंगावर पडून राहतात. त्यांचं शरीर रोगांचं, विकारांचं आगार बनतं. आता मी काय करू, असा प्रश्न पडतो आणि आयुष्य अर्थहीन होऊन जातं. म्हणून आयुष्यातला उद्देश कधीही हरवता कामा नये. ८० वर्षांच्या आज्जीने हे करून दाखवलं. नव्वदीचे आजोबा कॉम्प्युटर शिकले, असं आपण वाचतो, ऐकतो. आयुष्यातला उद्देश कधीही हरवू न देण्याच्या विचारामुळे ते असं करू शकतात. क्रियाशील असलेले लोक सतत आनंदी असतात. त्यांचं मन कायमच प्रसन्न असतं.

महर्षी वाल्मिकी म्हणतात की, माणसासाठी काहीही अशक्य नाही. यासाठी गरज असते ती उत्साहाची, उल्हासाची, उर्मीची. उत्साही मनुष्य अशक्य गोष्ट शक्य करून दाखवतो. दु:खामुळे आयुष्यातले यशाचे सगळे मार्ग बंद होतात. तर आनंदी आणि उत्साही राहिल्याने आयुष्याला नवी दिशा मिळते. सकारात्मकतेचा प्रभाव आयुष्यातल्या प्रत्येक निर्णयात दिसून येतो. आपण परिस्थितीला घाबरतो. पण त्याऐवजी स्वत:ला घाबरायला हवं. माझा मार्ग योग्य आहे का, हा प्रश्न स्वत:ला विचारा. मनाने होकार दिला तर पुढे जा. कोणताही विचार करू नका. मनात किंतू आणू नका. महात्मा गांधींनीही हेच सांगितलंय. कर्तव्याचा संघर्ष सुरू असेल तर मनातल्या सूक्ष्म शक्तीला आवाज द्या. तिच्याशी बोला. आपल्या मनाचा निर्णय अंतिम असू द्या.

## लाओत्सेंचा ताओ धर्म

धर्म देशोदेशीचे

चीनमध्ये ताओ धर्माला मान्यता मिळाली आहे. लाओत्से यांनी ताओ धर्माची स्थापना केली. लाओत्से यांना लाओ-सू किंवा लाओ-सी या नावानेही ओळखलं जातं. लाओत्से हे चीनमधले प्रसिद्ध तत्त्वज्ञानी. ताओ ते चिंग या नावानेही त्यांची ओळख आहे. या नावाने त्यांनी लेखन केलं. लोकांना उपदेश केला. लाओत्से यांच्या विचारधारेवर आधारित धर्म म्हणजे ताओ धर्म. लाओत्से यांना परमेश्वरासमान मानलं जातं. इसवीसन पूर्व सहाव्या शतकात झोऊ राजाच्या काळात लाओत्से होऊन गेले, असं चीनी लोकं मानतात. लाओत्से यांचे कान बरेच मोठे होते. मोठ्या कानाचे लोक बुद्धीवान असल्याचं मानलं जातं. त्यामुळे लाओत्से यांच्या चेहऱ्यावर ज्ञानाचं तेज झळकत असे. लाओत्से ९० वर्षं जगले.



लाओत्से यांच्या विचारांवर आधारित असलेला ताओ हा धर्म चीनमधला प्राचीन धर्म आहे. ताओ हा फक्त धर्म नाही तर हिंदू धर्माप्रमाणे ही एक जीवनशैली आहे. जुन्या काळात ताओ धर्माला ताओ दर्शन असं म्हटलं जायचं. गौतम बुद्धाच्या उदयानंतर चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार झाला. इथल्या विचारवंतांनी बौद्ध धर्मातलं तत्त्वज्ञान अंगिकारलं. यामुळे एका विचारावर आधारित असलेलं ताओ दर्शनाचं रूपांतर ताओ धर्मात झालं. अर्थात बौद्ध आणि ताओ या दोन्ही धर्मांमध्ये अहिंसात्मक संघर्ष होत राहिला. हा वैचारिक संघर्ष होता. पण आजच्या काळात या दोन्ही धर्मांचे, विचारधारेचे अनुयायी गुण्यागोविंदाने नांदत आहेत. जुन्या काळातला हा संघर्ष आता संपलाय. चीनमधली ५० ते ८० टक्के लोकसंख्या बौद्ध आहे. ताओ धर्माच्या अनुयायांची संख्या खूपच कमी झालीये. 'दाओ दे चिंग' आणि 'जुआंग जी' या ग्रंथांमधून लाओत्से यांनी आपले विचार मांडले. हे ग्रंथ ताओ धर्माचे आधारस्तंभ मानले जातात. यिन आणि यांग हे ताओ धर्मातले देवी आणि देवता आहेत. या धर्मात कर्मकांड, पशुबळी यांना मान्यता आहे. लाओत्से यांचा ताओ धर्म आजही अस्तित्त्वात आहे.

## भाग्यकारक रोपटी

वास्तू भक्ती

घरातला प्रत्येक कोपरा आपल्या आयुष्यावर प्रभाव टाकत असतो. यासोबतच घराच्या सजावटीसाठी वापरली जाणारी प्रत्येक वस्तूही कळत नकळत जीवनावर प्रभाव टाकत असते. या वस्तूंचा आपल्यावर सकारात्मक आणि नकारात्मक असा प्रभाव पडत असतो. घरात लावलेली झाडंही सौभाग्य आणि दुर्भाग्याला आमंत्रण देत असतात. आवड व हौस म्हणून आपण रोपटी लावतो. पण त्याचे चुकीचे परिणामही होऊ शकतात. म्हणूनच घरात कोणती झाडं लावणं शुभं मानलं जातं याविषयी जाणून घेणं गरजेचं ठरतं.



* अनेकांच्या घरात तुळशी वृंदावन असतं. तुळस दक्षिणेकडे ठेऊ नये. दक्षिणेकडे ठेवलेली तुळस नकारात्मक ऊर्जा निर्माण करते.
* घरात कृत्रिम रोपटी आणि झाडं लावू नये. कृत्रिम झाडं लावणं वास्तूशास्त्राला मान्य नाही. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो, असं म्हटलं जातं.
* धनलाभाच्या दृष्टीकोनातून घरात मनीप्लांट लावला जातो. मनी प्लांट घराच्या दक्षिण-पूर्व दिशेला लावायला हवा. या रोपट्याला सतत पाणी द्यायला हवं. यामुळे धनलाभ होतो.
* बेडरूममध्ये रोपटी लावू नये. यामुळे पती-पत्नींमधला ताण वाढतो. वाद-विवाद, भांडणं होऊ शकतात.
* घर आणि ऑफिसमध्ये सकारात्मक ऊर्जा रहावी यासाठी फुलदाण्या ठेवा. परंतु फुलदाण्या रिकाम्या ठेऊ नका. त्यातील कोमेजलेली फुलं लगेच काढून टाका. त्या जागी ताजी फुलं ठेवा. कोमेजलेल्या फुलांमुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.
* कोरफड, कॅक्टससारखी रोपटी घरात लावू नये. काटेरी रोपट्यांमुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो आणि स्वभाव आळशी बनतो. आजारपणांचं प्रमाण वाढतं.
* चंपा, चमेलीसारखी सुगंधी फुलांची झाडं घराच्या बाहेर लावता येतील. अशी झाडं घरात लावणं वास्तुशास्त्राला मान्य नाही.

## या सवयी बदला

शास्त्रांमधून

हिंदू धर्मातील शास्त्रांमध्ये काही गोष्टी अशुभ मानण्यात आल्या आहेत. या संदर्भात आपल्या सवयींमधून विचार आणि संस्कारांचं दर्शन घडत असतं. या सवयी भविष्यातलं यश निश्चित करत असतात. शास्त्रांमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या या सवयी अशुभ फळ देणाऱ्या आहेत. या सवयींविषयी जाणून घेऊन त्या बदलण्यातच खरा शहाणपणा आहे.



* आंघोळीनंतर स्वच्छतागृह घाण ठेवलं तर चंद्राचा कोप होतो. जलतत्त्वावर चंद्राचा प्रभाव असतो. त्यामुळे आंघोळीनंतर बाथरूम स्वच्छ करायला हवं. फरशीवर पसरलेलं पाणी काढून टाकायला हवं. यामुळे शरीराचं तेज वाढतं आणि चंद्राची आपल्यावर कृपा राहते.
* जेवल्यानंतर उष्ट ताट सिंक किंवा बाथरूममध्ये ठेवायला हवं. उष्ट ताट असंच टाकून गेल्याने आयुष्यात यश मिळत नाही. मेहनत केल्यानंतरही त्याचं योग्य फळ मिळत नसेल तर ही सवय बदलून बघा. उष्ट ताट जागेवर ठेवल्याने शनी आणि चंद्राशी संबंधित दोष दूर होऊन लक्ष्मीची कृपा राहते.
* पादत्राणं इतस्तत: ठेऊ नये. घरात पादत्राणं अस्ताव्यस्त पडली असतील तर मान-सन्मान कमी होतो. शत्रूचा त्रास वाढतो.
* पलंगावर सामान पडलं असेल, घाणेरड्या चादरी घातल्या असतील तर नकारात्मक प्रभाव पडतो. ही सवय आरोग्यासाठी हानिकारक मानली जाते.
* मोठ्याने, रागाने बोलणाऱ्या व्यक्तीला शनिदोषाचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपलं म्हणणं शांतपणे मांडा. घरात शांतता राखा. उगाचच आरडाओरडा करू नका.
* रात्रभर जागरण करणाऱ्या व्यक्तीला चंद्रदोषाचा सामना करावा लागतो. अशा लोकांना बरेच ताण असतात.
* थुंकण्याची सवय असलेल्या लोकांवर महालक्ष्मी रूसून बसते. या सवयीमुळे मान-सन्मान मिळत नाही.
* घरातल्या ज्येष्ठांचा अपमान केल्याने प्रगती खुंटते. घराची भरभराट होत नाही. ज्येष्ठ मंडळी खूश असलेल्या घरावर देवीदेवतांची कृपा राहते.
* पाय स्वच्छ ठेवले पाहिजे. पाय घाण असतील तर तुम्हाला यश मिळत नाही. तसंच इतरांपुढे अपमान होतो.

# विद्रोही साहित्य संमेलनाला दणक्यात सुरुवात

**■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २२ :** तळपणारे ऊन, सकाळी १० वाजल्यापासूनच आग ओकणारा सूर्य. तर दुसरीकडे विद्रोहाच्या, समतेच्या, एकात्मतेच्या विचारांनी आलेले विद्रोही. ना कोणाची कुठली जात ना धर्म. प्रत्येक व्यक्ती फक्त आपल्या हक्कांविषयी, समतेविषयी बोलतोय. एकुणच वातावरण भारावलेले. आणि त्यात आदिवासी समाजाच्या वेगवेगळ्या वाद्यांमधून निघणारे मंगलमय सूर, ताशाच्या गजरावर ठेका धरलेले कार्यकर्ते. आनंदाचे डोही आनंदी तरंग. असे वातावरण आज सकाळी शहरात पाहायला मिळाले. रस्त्यावरून जाणारा प्रत्येक व्यक्ती या आगळ्या-वेगळ्या मिरवणुकीकडे क्षणभर पाहून पुढे सरकत होता.



नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर समांतर, पण वेगळे असे विद्रोही साहित्य संमेलन छत्रपती संभाजीनगरमध्ये होत आहे. सांस्कृतिक विचारयात्रेने १९ व्या अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाला आज सुरुवात झाली.

१९ वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन शहरात आमखास मैदानावरील मलिकअंबर नगरीत होत आहे. यात परिसंवाद, कविसंमेलने, व्याख्यान, गटचर्चा यांची रेलचेल असून, १० हजारांपेक्षा अधिक रसिक सहभागी होतील, असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला या नाटकाच्या प्रयोगाने संमेलनाला सुरुवात झाली.

शनिवारी, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सांस्कृतिक विचारयात्रा निघाली. हिंदी साहित्यिक कंवल भारती यांच्या हस्ते संविधान मंचावर संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक राणा, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. वासुदेव मुलाटे, उर्दू साहित्यिक नुरुल हस्नैन, स्वागताध्यक्ष सतीश चकोर, मुख्य निमंत्रक धनंजय बोरडे आणि प्रा. प्रतिमा परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

संमेलनाचे उद्घाटक हिंदी साहित्यिक कंवल भारती म्हणाले, संमेलनाच्या निमित्ताने आज मी पहिल्यांदाच या शहरात आलोय. एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्रोहींचा मेळावा मी आज पहिल्यांदाच पाहिलाय. संभाजीनगरवासियांचा साहित्याकडे असलेला ओढा, प्रेम पाहून मला भरून आले आहे. विद्रोहाकडे आपण जात आहोत. ते एक मोठ्या क्रांतीचे प्रतीक आहे.

संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक राणा म्हणाले, अध्यक्ष पद मला मिळालं याचा मला खूप आनंद होतोय. विद्रोही सांस्कृतिक चळवळ काही वर्षांपासून फार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रभर वेगाने पुढे जात आहे. आणि जे शहर संमेलनासाठी निवडलय ते चळवळीचे शहर आहे. येथील नामांतर आंदोलनांनी पूर्ण महाराष्ट्राला आणि भारताला एक दिशा दिलेली आहे. एका इतिहास संशोधकाला याठिकाणी संधी मिळाली हा आनंदाचा क्षण आहे. आपल्या स्वभावात विद्रोह तर आहेच तो चालूच राहणार आहे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रतिमा परदेशी म्हणाल्या, हे मराठी साहित्य संमेलन संविधान मूल्यांना आम्ही समर्पित केलेले आहे. संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. एकीकडे संविधानाचे मारेकरी वाढत असताना हे संविधान जनतेपर्यंत पोहचवण्याची विद्रोही म्हणून आमची जबाबदारी आहे.

बाहेर बहुमताची भलतीच चर्चा चाललेली आहे. पण तुकोबारायांनी सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता, या विचारांनी आम्ही पुढे जात आहोत. सत्य हे सिद्ध होईपर्यंत आम्ही आमचा संघर्ष चालूच ठेवणार आहोत. सरकारला अजून दाभोळकर, पानसरे यांचे मारेकरी सापडत नाही. सरकारचा सत्ताधारी वर्गाचा हा नाकर्तेपणा आहे. त्यांना टीनपाट सुपारी पंटर पण लोक सापडतात पण खुनाचे मानेकरी सापडत नाही. हा विचारांचा संघर्ष आम्ही मानतो.

**तिथे सरकारचे पैसे इथे जनतेचा आवाज**

दिल्लीतलं साहित्य संमेलनाविषयी बोलताना परदेशी म्हणाल्या, खरं तर आम्हाला घाबरून ते पळून गेलेले आहेत. कारण मागच्या ५ संमेलनात त्यांचा पराभव झाला. खुर्च्या रिकाम्या होत्या. या मराठी भूमीमध्ये मराठी साहित्य संस्कृतीचा झेंडा घेऊन ठामपणे उभे आहोत. तिथे सरकारचे महामोर पैसे आहेत पण इथे जनतेचा आवाज आहे. आमचं संमेलन त्यामुळे महाप्रवाह हे झालेलं आहे. महात्मा फुले यांनी जे स्वप्न पाहिलं होतं की १९ व्या शतकात आमचे ग्रंथकार आमच्या सभा भरवतील. ते विद्रोहीने सत्यात उतरवलं आहे. याचा आज आनंद होतो.

रविवार, २३ फेब्रुवारीला सकाळी ८ वाजता आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रम होईल. ९ ते ११ या वेळेत विविध सामाजिक विषयांवर गटचर्चा होणार आहे. त्यानंतर मान्यवरांचे सत्कार होतील. दुपारी १२ वाजता अंधकारमय काळात नवे विषय नवी आव्हाने, नवे लेखन या विषयावर शाहू पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होईल.

प्रा. वृषाली रणधीर यांचा मी सावित्री जोतीराव फुले बोलतेय हा एकपात्री कार्यक्रम सादर होईल. दुपारी संविधान आणि लोकशाहीला कॉर्पोरेट मनुवाद्यांचे आव्हान या विषयावर निरंजन टकले यांचे विशेष व्याख्यान होईल. त्यानंतर ए बिस्मिल्ला एकांकिका सादर होईल.

सायंकाळी इतिहासाच्या विकृतीकरणाविरुद्ध सत्य इतिहास कथन व लेखन परिसंवाद होईल. यात संध्या नरे-पवार, वैशाली डोळस, डॉ. सुभाष बागल व चंद्रकांत झटाले सहभागी होणार आहेत. सायंकाळी कविसंमेलन, गझल संमेलन होईल. रात्री ८ वाजता इतिहास अभ्यासक चंद्रशेखर शिखरे, अभिनेता योगेश शिरसाट, साहित्यिक अस्लम मिर्झा, डॉ. भालचंद्र कांगो यांच्या उपस्थितीत ठराव वाचनाने संमेलनाचा समारोप होणार आहे. १९ वे विद्रोही साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह प्रसिद्ध चित्रकार राजानंद सुरडकर यांनी रेखाटले आहे. हे संमेलन भारतीय संविधानाला समर्पित आहे.

# जीबीएसचा तिसरा बळी

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** उपराजधानीत जीबीएसचे रुग्णासह मृत्यू वाढत असल्याने आरोग्य विभागात चिंता वाढली आहे. शहरातील शासकीय रुग्णालयात जीबीएसचा तिसरा मृत्यू नोंदवण्यात आला. दरम्यान मेडिकलमध्ये या आजाराचे बरेच रुग्ण दाखल आहेत

नागपुरात गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) मृत्यूसंख्या वाढत आहे. शुक्रवारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) उपचार सुरू असलेल्या एका ३२ वर्षीय रुग्णाचा या आजाराने मृत्यू झाल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे नागपुरातील विविध रुग्णालयात या आजाराने दगावलेल्या रुग्णांची संख्या तीनवर पोहचली आहे. दरम्यान दगावलेला रुग्ण हा मध्यप्रदेशचा आहे.

मध्य प्रदेशला प्रकृती खालावल्यावर त्याला नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) दाखल करण्यात आले होते. तो अनेक दिवसांपासून जीवनरक्षण प्रणालीवर होता. शुक्रवारी त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे नागपुरातील विविध रुग्णालयात या आजाराने दगावलेल्या रुग्णांची संख्या आता तीनवर पोहचली आहे. तर नागपुरात हळूहळू हे रुग्ण वाढताना दिसत असून आजपर्यंत या आजाराचे तब्बल २१ रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी मेडिकलमध्ये एक साडेसात वर्षांचा मुलगा व एक वयस्क असे दोन रुग्ण अत्यवस्थ आहेत.

नागपूर जिल्ह्यातील विविध रुग्णालयांत आढळलेल्या रुग्णांमध्ये सर्वाधिक रुग्ण मेडिकलमध्ये नोंदवले गेले. मेडिकलमध्ये आजपर्यंत या आजाराच्या आढळलेल्या जीबीएस रुग्णांची संख्या १२ आहे, हे विशेष. दरम्यान नागपुरातील विविध रुग्णालयात आढळलेल्या रुग्णांपैकी नऊहून जास्त रुग्ण जिल्ह्याबाहेरील आहेत. मेडिकलमधून एका रुग्णाच्या कुटुंबीयांनी इतर रुग्णालयात हलवले. तर चार रुग्ण यशस्वी उपचारानंतर घरी परतले.

# धंगेकर काँग्रेस सोडणार?

**■ वृत्तसंस्था पुणे, दि. २२ :** माजी आमदार रवींद्र धंगेकर काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्याची चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे. रवींद्र धंगेकर यांनी व्हाट्सअपला स्टेटस ठेवत सगळ्यांच्या नजरा खिळवल्या आहेत. गळ्यात भगवा परिधान करून धंगेकर यांनी 'शहा का रुतबा' हे गाणे त्याला लावले आहे. त्यामुळे आता धंगेकर हे लवकरच शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.



काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुण्यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या बालेकिल्ल्याला मोठा सुरूंग लावला होता. त्यामुळे त्यांची राज्यभरात चांगलीच चर्चा रंगली होती. त्यानंतर धंगेकर यांच्या नेतृत्वात काँग्रेसने पुण्यात केलेल्या आंदोलनाची देखील चांगलीच चर्चा झाली होती.

मात्र, मधल्या काळात त्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने ते शिंदेंच्या सेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली. यातच काँग्रेसचे नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी रवींद्र धंगेकर यांना पक्ष निरीक्षकांच्या यादीतून डावलले होते. विधानसभा मतदारसंघात निरीक्षक आणि सहाय्यक निरीक्षक पदाच्या नियुक्ती काँग्रेसकडून करण्यात आल्या. मात्र या यादीतून धंगेकरांना डावलण्यात आले होते. त्यामुळे याबाबत राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू झाली होती.

माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी काही दिवसांपूर्वीच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. त्यांच्या या भेटीमुळे ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, आता त्यांच्या व्हाट्सअप स्टेटस वरुन हीच चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. ते शिंदेसेनेत जाणार असल्याचे बोलले जाते.

# जन्म नोंदणीसाठी बनावट शाळा सोडल्याचे दाखले

**■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २२ :** जन्म नोंदणीसाठी खोटे व बनावट शाळा सोडल्याचे दाखले जोडण्यात आल्याचे धक्कादायक प्रकार अकोला जिल्ह्यात उघडकीस येत आहेत. भाजप नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या तक्रारीनंतर उशिरा नोंदणी झालेल्या जन्म प्रमाणपत्राची पडताळणी केली जात आहे.

बार्शीटाकळी येथील तहसील कार्यालयात बनावट व खोट्या दाखल्यावरून जन्म नोंदणी आदेश निर्गमित करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी १२ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. बांगलादेशी रोहिंग्या मुस्लिमांविरोधात किरीट सोमय्या यांनी आक्रमक पवित्रा घेतला.

अमरावती जिल्ह्यातील अंजनगावसुर्जी येथे एक हजार बनावट प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर किरीट सोमय्या यांनी आपला मोर्चा अकोला जिल्ह्याकडे वळवला. अकोला जिल्ह्यातही बनावट जन्म प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला. जिल्ह्यात तब्बल १५ हजार ८४५ जन्म प्रमाणपत्र उशिराने देण्यात आले आहेत. जिल्ह्यात विविध भागांत वास्तव्यास असलेल्यांनी गैरमार्गाने जन्म दाखला मिळवून भारताचे नागरिकत्व मिळवल्याचा आरोप सोमय्या यांनी केला.



या प्रकरणात त्यांनी महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन काही पुरावे देखील सादर केले आहेत. या प्रकरणात महसूल विभागाने कागदपत्रे पडताळण्याची मोहीम सुरू केली. बार्शीटाकळी तालुक्यातील जन्म नोंदणी प्रमाणपत्र आदेश मिळवण्यासाठी प्रस्ताव सादर केलेल्या व ज्यांना जन्म नोंदणी प्रमाणपत्राचे आदेश निर्गमित करण्यात आले, त्यांच्या सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे.

या कागदपत्रांमध्ये शाळेच्या दाखल्यावर खोडाखोड किंवा आक्षेपार्ह मजकूर असल्यास ते दाखले शाळेत प्रत्यक्ष जाऊन तपासण्यात येत आहेत. त्याचे अहवाल देखील सादर करण्यात आले.

या तपासणीमध्ये बार्शीटाकळी तहसील कार्यालयातून १२ जणांनी बनावट कागदपत्रे सादर करून जन्म नोंदणी आदेश मिळविल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याविरुद्ध महसूल सहाय्यक संजीव देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल करण्यात आले.

आरोपी जाकेराबी मजिदखा ऊर्फ जाकेराबी नबी खारा, खडकपुरा, रेहानाबी अब्दुल सत्तार, जंबुनिसा अजिज खान, सै. आशिक अली सै. लियाकत अली, शकिला बी शेर खान, शेख मुसा शेख रौफ, शेख बिस्मील्ला शेख अब्दुला, अकिलाबी शेर इखान, जहाँ आराबेगम मो. शकी, मौ. अब्दुल अजीज शेख मस्ताना, रफीकुन्नीसा अब्दुल जब्बार, मान्ती आत्माराम कराळे या आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास बार्शीटाकळी पोलीस करीत आहेत.

# दुबईच्या मैदानावर टीम इंडिया अजिंक्य

चॅम्पियन्स ट्रॉफीमधील हायव्होल्टेज सामना म्हणजेच भारत वि. पाकिस्तान सामना २३ फेब्रुवारीला दुबईमध्ये होणार आहे. भारतीय संघाने बांगलादेशविरुद्ध ६ विकेट्सने विजय मिळवत विजयासह मोहिमेची सुरूवात केली. आता टीम इंडियाचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. या मैदानावर टीम इंडियाचा रेकॉर्ड उत्कृष्ट आहे आणि या मैदानावर बांगलादेश, पाकिस्तान, हाँगकाँग आणि अफगाणिस्तानविरुद्ध सामने खेळले आहेत.

भारतीय संघाने दुबईच्या मैदानावर आतापर्यंत एकूण ७ एकदिवसीय सामने खेळले आहेत, त्यापैकी ६ जिंकले आहेत आणि एक सामना बरोबरीत राहिला आहे. या मैदानावर टीम इंडियाला एकदिवसीय क्रिकेटमध्ये पराभवाचा सामना करावा लागला नाही आणि भारताने सर्व प्रतिस्पर्धी संघांना पराभूत केले आहे.

भारताने दुबईच्या मैदानावर पाकिस्तानविरुद्ध दोन एकदिवसीय सामने खेळले असून दोन्ही सामने जिंकले आहेत. दोन्ही संघांमधील हे सामने एकदिवसीय आशिया चषक २०१८ मध्ये खेळले गेले. एका सामन्यात भारताने ८ विकेट्सने तर दुसऱ्या सामन्यात ९ विकेटने विजय मिळवला होता. आता ७ वर्षांनंतर दोन्ही संघ पुन्हा एकदा दुबईच्या मैदानावर एकदिवसीय सामना खेळणार आहेत.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांकडे स्टार खेळाडू आहेत, जे अवघ्या काही चेंडूंमध्ये सामन्याचा रोख बदलू शकतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हायव्होल्टेड सामना असतो. फक्त भारत पाकिस्तान नाही सर्वच संघांचे चाहते हा सामना पाहत असतात.

२०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानी संघाची सुरुवात खूपच खराब झाली होती. त्यांना पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ६० धावांनी पराभव पत्करावा लागला होता. दुसरीकडे, पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशवर ६ विकेट्सने विजय मिळवला होता.

या सामन्याविषयी भारत आणि पाकिस्तानात कमालीची उत्कंठा आहेच. 'पाकिस्तानात विराट आणि रोहितचे लाखो चाहते आहेत. आम्हाला त्यांना इथे खेळताना पहायचे होते. भारतीय संघाला इथे जितके प्रेम मिळते तितके इतर कुठेही मिळणार नाही. क्रिकेटला राजकारणापासून मुक्त ठेवले पाहिजे. आम्हाला इतर देशांसोबत जसे क्रिकेट खेळायचे आहे तसेच भारतासोबतही क्रिकेट खेळायचे आहे, असे अनेक पाकिस्तान चाहत्यांचे मत आहे.

लाहोर सलमान हैदर म्हणतो, २९ वर्षांनंतर पाकिस्तानमध्ये आयसीसी स्पर्धा होत आहे. आशा होती की टीम इंडिया देखील सामना खेळण्यासाठी येईल, पण तसे झाले नाही. भारत आपले सर्व सामने दुबईमध्ये खेळेल.

लाहोरमध्ये सर्वत्र चॅम्पियन्स ट्रॉफीची चर्चा आहे. लोक रस्त्यावर क्रिकेटबद्दल बोलत आहेत. या चर्चेत दोन कारणांमुळे राग आहे. प्रथम, त्यांच्या संघाला सुरुवातीच्या सामन्यातच न्यूझीलंडकडून पराभव पत्करावा लागला. जर पाकिस्तानने दुसरा सामनाही गमावला तर ते उपांत्य फेरीच्या शर्यतीतून जवळजवळ बाहेर पडेल. दुसरी नाराजी म्हणजे भारताने या स्पर्धेसाठी पाकिस्तानला संघ पाठवला नाही. भारताचे सामने दुबईमध्ये होतील. जर संघ अंतिम फेरीत पोहोचला तर तो सामनाही दुबईमध्येच होईल.



भारतीय संघ न येण्याबद्दल पाकिस्तानी लोक म्हणतात, 'शत्रू निर्माण करून समुदाय प्रगती करत नाहीत, भारताने एक पथक पाठवायला हवे होते' संबंधांमधील कटुतेमुळे, केवळ क्रिकेटच नाही तर दोन्ही देशांमधील व्यवसायही ठप्प आहे.

फासले ऐसे भी होंगे,
ये तो कभी मैंने सोचा न था।
पास होकर मेरे,
वो मेरा न था।

विराट कोहलीचे पाकिस्तानमध्ये खूप चाहते आहेत. कोहलीने पाकिस्तानमध्ये एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. पाकिस्तानमध्ये खेळल्याशिवाय त्याची कारकीर्द अपूर्ण राहील.

पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीचा गतविजेता आहे. २०१७ मध्ये स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताला हरवून त्यांनी विजेतेपद पटकावले. यावेळी त्यांची सुरुवात पराभवाने झाली. जर भारताने पाकिस्तानला हरवले तर त्यांना उपांत्य फेरीत पोहोचणे खूप कठीण होईल.

१७ वर्षांपूर्वी टीम इंडिया आशिया कप खेळण्यासाठी पाकिस्तानला गेली होती टीम इंडिया शेवटचा २००८ मध्ये आशिया कप खेळण्यासाठी पाकिस्तानला गेली होती.

स्पर्धेत दोन्ही संघ दोनदा एकमेकांसमोर आले. २६ जून रोजी झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानला सहज पराभूत केले. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत ३०० धावांचे लक्ष्य ठेवले. कर्णधार शोएब मलिकने सर्वाधिक १२५ धावा केल्या. भारताने विजयासाठी आवश्यक धावा ४२ षटकांत पूर्ण केल्या. सलामीवीर वीरेंद्र सेहवागने ११९ धावा केल्या. भारताने हा सामना ६ विकेट्सने जिंकला.

यानंतर, २ जुलै रोजी सुपर-४ फेरीत भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकमेकांसमोर आले. यावेळी टीम इंडियाचा पराभव झाला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ५० षटकांत ७ गडी गमावून ३०८ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानने दोन विकेट गमावून ३०९ धावा केल्या. युनूस खानने १२३ धावा केल्या.

टीम इंडियाने पाकिस्तानमध्ये शेवटचा सामना श्रीलंकेविरुद्ध खेळला. अंतिम सामन्यात संघाला श्रीलंकेकडून पराभव पत्करावा लागला. २०२३ मध्ये एकदिवसीय विश्वचषक खेळण्यासाठी पाकिस्तान संघ भारतात आला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ७ विकेट्सने पराभव केला. एकदिवसीय विश्वचषकात टीम इंडियाचा पाकिस्तान विरुद्धचा हा सलग आठवा विजय होता.




## भारताला हरवण्याची ताकद

पाकिस्तानी अष्टपैलू खेळाडू खुशदिल शाहचा असा विश्वास आहे की भारत एक मजबूत संघ आहे, पण त्यांना पराभूत करण्याची ताकद पाकच्या संघात आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध खुशदिलने ६९ धावांची खेळी खेळली. तथापि, न्यूझीलंडने हा सामना ६० धावांनी जिंकला.



खुशदिल शाह यांनी टेलिकॉम एशियाला सांगितले की, भारत एक उत्तम संघ आहे. प्रत्येक संघ सामना गमावू शकतो. जर आपण आपला 'अ' सामना खेळलो तर आपण भारताला हरवू. जेव्हा भारत आणि पाकिस्तान खेळतात तेव्हा संपूर्ण जग पाहते. जो संघ दबाव चांगल्या प्रकारे हाताळतो, तो जिंकतो आणि आम्ही हे आधीही केले आहे. आम्ही एक सामना गमावला आहे, पण तरीही स्पर्धेत आहोत. पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून पराभव पत्करल्यानंतर आता पाकिस्तानसाठी करो या मरो अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# परीक्षेत कॉपी प्रकरणी शिक्षणमंत्र्यांची कारवाई

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** जालन्यातील बदनापूर येथील पेपरफुटीच्या मुद्यावर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी कठोर भूमिका घेतली आहे. या प्रकरणी त्यांच्या निदेशांनुसार पेपर फोडणाऱ्या झेरॉक्स सेंटरच्या चालकासह एका अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे व्हॉट्सॲपवर प्रसारित केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

राज्यात दहावी बोर्डाच्या परीक्षेला शुक्रवारपासून सुरुवात झाली. या परीक्षेसाठी प्रशासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. विशेषतः यंदा कॉपीमुक्त अभियानावर चांगलाच जोर दिला जात आहे. पण परीक्षेच्या पहिल्याच दिवशी मराठीचा पेपर फुटला. जालन्याच्या बदनापूर येथील एका परीक्षा केंद्रावर हा प्रकार घडला. प्रशासनाने प्रारंभी या प्रकरणी पेपर फुटला नसून, केवळ दगडफेक झाल्याचा दावा केला. पण पेपरफुटीचा प्रकार पुराव्यासह समोर आल्यानंतर शिक्षण विभागात एकच खळबळ माजली. त्यानंतर पोलिसांनी तपासाची वेगवान चक्रे फिरवली.

दुसरीकडे, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी पेपरफुटीवर तीव्र संताप व्यक्त केला. तसेच संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, एका मल्टीसर्व्हिसेस चालकासह अन्य एका अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे व्हॉट्सॲपवर प्रसारित केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

# महाकुंभमेळ्यात पोहोचण्यापूर्वी पत्नीसमोरच पतीचा मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २२ :** महाकुंभमेळ्याला जाण्यासाठी निघालेलया दाम्पत्याचे दर्शन आणि त्रिवेणी संगममध्ये स्नानाचे स्वप्न, उत्कट इच्छा अखेर अपूर्णच राहिली. कारने प्रयागराजकडे निघालेल्या या जोडप्यातील पतीचे मार्गातच अपघाती निधन झाले. मध्यप्रदेशातील कटनीनजीक झालेल्या विचित्र अपघातात पती ( सुभाष लढ्ढा) यांचा मृत्यू झाला .त्यांच्या मृतदेहावर आज शनिवारी सकाळी नांदुरा येथे शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी नांदुरा शहरवासी मोठया संख्येने उपस्थित होते.

नांदुरा येथील बालाजी सुपर मार्केटचे मालक सुभाष मदनलालजी लढ्ढा (६०) व त्यांची पत्नी सरला लढ्ढा खाजगी वाहनाने आणि मुरलीधर लढ्ढा व त्यांची पत्नी हे दुस?या वाहनाने नांदुरा येथून निघाले होते. रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास मध्यप्रदेशातील कटनी नजीक पोहोचले. त्यावेळी सुभाष लढ्ढा यांच्या वाहनात आवाज येत होता. आपल्या वाहनातून वेगळाच आवाज येत असल्यामुळे ते पाहण्यासाठी खाली उतरले.

ते गाडीतून उतरून गाडीत आवाज कशाचा येत आहे हे पहात होते. त्याच वेळी मागून भाजीपाला घेवून भरधाव येणाऱ्या मालवाहू बोलोरोने त्यांना धडक दिली. मालवाहू वाहन चालकाने १५-२० फूट फरपटत नेल्याने सुभाष लढ्ढा गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले.

मध्यप्रदेश मधील कटनी येथे शवविच्छेदन करण्यात आल्यावर काल रात्री उशिरा त्यांचा मृतदेह नांदुरा येथे आणण्यात आला. सकाळी अंत्ययात्रा काढण्यात आली. सुभाष लढ्ढा यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, मुलगा, मुलगी, पत्नी असा आप्तपरिवार आहे.


**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा 2)**

**हिंगणघाट शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित 1) आदर्श विद्यालय साखरा 2) आदर्श माध्यमिक विद्यालय सेलू (मू) 3) आदर्श विद्यालय पिंपळगाव जि. वर्धा**

पवित्र प्रणालीद्वारे हिंगणघाट शिक्षण संस्था हिंगणघाट, या व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये खाली नमूद केलेल्या शिक्षण सेवक (वर्ग 9 व 1 0) पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत (मुलाखतीसह)

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदाचा तपशिल**

मान्य दिनांक : 20/02/2025

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतन श्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET /CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Gratuate Teacher (Std 9-10) | (consolidated pay) Gt 9-10 (18000) | Aided | mathematiics | Marathi | Graduation B.Sc | Graduation, B.ed | - | 1 |
| 2 | Marathi | Gratuate Teacher (Std 9-10) | (consolidated pay) Gt 9-10 (18000) | Aided | Language ( Marathi) | - | Graduation B.A | Graduation, B.ed | - | 1 |
| | | | | | | | | | Total | 2 |

समांतर आरक्षणाव्यतिरिक्त रिक्त पदाचा तपशिल १) अनु. जाती -१ पदे २) अनु. जमाती -१ पदे एकुण -२

महत्वाची सुचना :-१) वरील पदासाठी शिक्षक भरती संदर्भात पवित्र पोर्टलवर दिलेल्या-अटी व नियम सर्व उमेदवारांसाठी बंधनकारक आहे, २) अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी ( 2022) TAIT प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait.2022. mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तीक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील, ३) शिक्षण सेवक भरतीकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी पदभरतीच्या सविस्तर जाहिरातीसाठी पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

अध्यक्ष
श्री. वा. ना. गौळकार
मो. नं. 9422143119